cmyk

## संपादकीय

### दिशाहिन घोषणा अन् तारेवरची कसरत

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून मुंबई येथे सुरुवात झाली आहे. निवडणूक पूर्व काळामध्ये मतदारांना जी विविध प्रकारची आश्वासने देण्यात आली होती त्या आश्वासनांची पूर्ती करण्याच्या दिशेने या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये काही निर्णय घेतले जाणार आहेत का हे पाहणे यानिमित्ताने महत्त्वाचे ठरणार आहे. अनेक मोफत योजनांचा भार पडत असल्याने महाराष्ट्राची तिजोरी मोठ्या प्रमाणात हलकी झाली आहे आणि विविध प्रकारच्या योजनांना कात्रीही लावण्याचा विचार सुरू आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com








बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३१० | मंगळवार, दि.४ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


# शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या अन्यथा १९ मार्चला मुंबईत आंदोलनाचा बॉम्ब फोडू

## रविकांत तुपकर यांचा राज्य सरकारला घाम फोडणारा इशारा: 'क्रांतिकारी'च्या पहिल्याच राज्य कार्यकारणी बैठकीला दर्दी अन गर्दी

**पुणे । प्रतिनिधी**

**क्रांतिकारी शेतकरी संघटना महाराष्ट्राची पहिली राज्य कार्यकारणी बैठक पुणे येथे सोमवारी (दि.३) मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी शेतकऱ्यांची बुलंद तोफ असलेल्या रविकांत तुपकर यांनी राज्य सरकारला इशारा देत १८ मार्चपर्यंत शेतकरी कर्जमाफीची घोषणा करा अन्यथा १९ मार्च रोजी मुंबई येथे आंदोलनाचा बॉम्ब टाकू असा खणखणीत इशारा दिला. शेतकऱ्यांच्या मागणीची दखल न घेतल्यास सरकार कितीही बलाढ्य बहुमताचे असले तरी त्यांना गुडघे टेकायला लावू असा इशाराही तुपकर यांनी दिला. यावेळी राज्यभरातील शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**




पाशवी बहुमत मिळाल्याने मदमस्त बनलेले सत्ताधारी दारून पराभवाच्या धक्क्याने खंगून गेलेले विरोधक राज्याची अवस्था आहे. शेतकरी संघटनांची चळवळ शिथिल झालेले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांची ◀◀ पान २ वर

### रविकांतभाऊ शेतकरी चळवळीचा आश्वासक चेहरा– प्रा.यशवंत गोसावी

प्रख्यात व्याख्याते तथा शेतकरी चळवळीतील नेते प्रा.यशवंत गोसावी यांनी तुफान शैली अन पहाडी आवाजात शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. रविकांत तुपकर हे महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा श्वासक चेहरा आहेत. तेच शेतकऱ्यांना न्याय मिळवून देऊ शकतात. शेतकऱ्यांचा आवाज बनून शासन आणि प्रशासनाशी भांडू शकतात. रवींकांतभाऊंचा आवाज बुलंद करण्यासाठी, तळागाळातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा एक कार्यकर्ता म्हणून सदैव सोबत असल्याचे यशवंत गोसावी यांनी सांगितले. ते नांदेड जिल्ह्यातील शेतकरी पिता– पुत्राच्या आत्महत्येचा प्रसंग सांगत असताना खचाखच भरलेल्या सभागृहातील शेतकऱ्यांचे डोळे पाणावले.

### 'किसान आर्मी'ची घोषणा

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी जशी इंग्रजांच्या काळात पत्री सरकारची स्थापना केली होती त्याच धर्तीवर क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून "किसान आर्मी" तयार करणार असल्याची घोषणा यावेळी रविकांत तुपकर यांनी केली. ही किसान आर्मी ठोका ठोकीचे काम करणार आहे. शेतकऱ्यांची सक्तीची वसूली करणारे बँक अधिकारी, शेतकऱ्यांची वीज तोडणारे, शेतकऱ्यांवर अन्याय अत्याचार करणारांना तसेच गुंड, मुजोर नेते यांना झडपून काढण्यासाठी किसान आर्मी ची टीम गावागावात काम करेल असे यावेळी रविकांत तुपकर यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### रक्षा खडसेंच्या मुलीची छेड काढणाऱ्यांना अटक

जळगाव : केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड प्रकरणातील सात संशयित पैकी चार जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेनंतर पोलिसांच्या तीन पथकाकडून आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. अनिकेत भोईलाही पोलिसांनी अटक केली आहे. इतर संशयित देखील शोध सुरू आहे. यात एक आरोपी अल्पवयीन असल्याची माहिती मिळते आहे.

### राष्ट्रवादीच्या वाट्याला विधानसभा उपाध्यक्षपद?

मुंबई : महायुतीत राष्ट्रवादीच्या वाट्याला विधानसभेचे उपाध्यक्षपद येण्याची शक्यता राष्ट्रवादीकडून राजकुमार बडोलेंना संधी दिली जाणार असल्याचे म्हटले जात आहे. अजित पवारांनी यापूर्वीच एससी प्रवर्गाला न्याय देण्यासाठी उपाध्यक्ष पद देणार असल्याची घोषणा केली होती. सामाजिक, राजकीय आणि प्रादेशिक समतोल पाहता अजित पवार यांच्याकडून बडोले यांना संधी दिली जाणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

### मराठा आंदोलक मनोज जरांगेंची तब्येत बिघडली

संभाजीनगर : मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची तब्येत बिघडली असून त्यांना उपचारासाठी संभाजीनगरच्या गॅलेक्सी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मनोज जरांगेंना थकवा जाणवत असून चक्करही येत असल्याची माहिती आहे.

# महाराष्ट्र में दोही गुंडे..कोकाटे और मुंडे!

## अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी धनंजय मुंडे, मानिकराव कोकाटेंच्या राजीनाम्यावरुन विरोधकांची घोषणाबाजी

**मुंबई । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख खून प्रकरणावरुन गेल्या पावणे तीन महिन्यापासून मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. तर दुसरीकडे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना जिल्हा न्यायलयाने दोन वर्षाची शिक्षा सुनावली आहे. या दोन मंत्र्यांच्या राजीनाम्यावरुन अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधक चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसले. राज्यात दोन गुंडे.. कोकाटे आणि मुंडे अशा घोषणाबाजी करण्यात आली.**





संतोष देशमुख खून प्रकरणात वाल्मिक कराड यांचे नाव आल्याने मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी सुरुवातीपासून सत्ताधारी व विरोधकांकडून करण्यात येत होती. आरोपपत्रात कराडचे नाव पहिल्या क्रमांकावर असल्याने पुन्हा मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. अधिवेशनाचा सोमवारी पहिलाच दिवस असताना विरोधकांनी धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यावरुन जोरदार घोषणाबाजी केली. माणिकराव कोकाटे यांना जिल्हा न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा सुनावल्याने त्यांच्याही ◀◀ पान २ वर

### मुंडेंनी घेतली फडणवीस, बावन्नकुळेंची भेट

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांनी अधिवेशनात लावून धरल्यावर कामकाज संपल्यावर मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दोघांमध्ये १५ मिनिटे चर्चा झाल्याचे समजते मात्र दोघांमध्ये काय चर्चा झाली हे मात्र समजू शकले नाही. तसेच मुंडे आणि चंद्रशेखर बावन्नकुळे यांच्यातही काही वेळ चर्चा झाली आहे. अधिवेशनात कोकाटेंच्या राजीनाम्याच्या मागणीवर बोलताना फडणवीस म्हणाले, कोर्टाचा आदेश मिळताच कोकाटेंचा राजीनामा घेतला जाईल, असे सांगितले.

### संतोष देशमुख खुनातील व्हिडिओ, फोटो हस्तगत

संतोष देशमुख यांचा खून झाला त्यावेळी फोटो आणि व्हिडीओ काढण्यात आला होता. यातील १५ फोटो, व्हिडीओ सीआयडीने हस्तगत केले असून त्यातील क्रुरता पाहून अनेकांच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही.

### सीआयडीच्या चार्ज सीटवर जरांगे पाटलांना शंका



संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात सीआयडीकडून चार्ज शीट दाखल करण्यात आले आहे, मात्र यावर आता मनोज जरांगे पाटील यांनी शंका उपस्थित केली आहे. बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. या घटनेमुळे राज्यभरात खळबळ उडाली, वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणात सुरुवातीपासूनच मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली. सरकारकडून या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला होता, तसेच एसआयटीची देखील स्थापना करण्यात आली होती. अखेर सीआयडीकडून आरोप पत्र दाखल करण्यात आले आहे. मात्र या आरोप पत्रावर प्रतिक्रिया देताना मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शंका उपस्थित केली आहे.

### मंत्री धनंजय मुंडेंबाबत २ दिवसांत अंतिम निर्णय?

मंत्री धनंजय मुंडेंबाबत २ दिवसांत अंतिम निर्णय मुंडेंवर होणारे आरोप आणि आरोपांमुळे होणारी सरकारची बदनामी लक्षात घेता निर्णय होण्याची शक्यता असून संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणात वाल्मिकचा समावेश आणि चार्जशीटमध्ये करण्यात आलेल्या उल्लेखामुळे धनंजय मुंडे अडचणीत येणार असल्याचे दिसते.

### नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?

चार्ज शीटवर शंका आहे, संतोष देशमुख यांच्या प्रकरणात सीआयडीने चार्ज शीट दाखल केले. मात्र उज्वल निकम यांची नियुक्ती झाल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी चार्जशीट दाखल करण्यात आले आहे, यामध्ये बड्या नेत्याचे नाव आले नाही, त्यामुळे शंका आहे, अशी प्रतिक्रिया यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे.

### मुंडे आधी धस मुख्यमंत्र्यांच्या भेटीला



आ.सुरेश धस यांनी अधिवेशनाचे कामकाज संपल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. दोघांमध्ये बराच वेळ चर्चा झाल्याची माहिती आहे.

### सरकार मुंडेंचा राजीनामा घेत नाही याची खंत– दमानिया



सरकारने धनंजय मुंडेंना बडतर्फ करायला हवे होते. मात्र सरकार मुंडेंच्या राजीनामा घेत नाही यांची खंत वाटते, असे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. सोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आजच मुंडेंचा राजीनामा घ्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे.

# अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ६ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या

### ८ मार्च रोजी लाडक्या बहिर्णींना मिळणार दोन हप्ते

राज्यातील लाडक्या बहिणींच्या बँक खात्यावर महिला दिनादिवशी २ महिन्यांच्या हप्त्याचा लाभ एकत्र जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे महिला दिनाचे गिफ्ट महिलांना मिळणार आहे. फेब्रुवारी महिन्याचा हप्ता लाभार्थी महिल्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला नाही. त्यामुळे विरोधकांकडून सरकारवर कठोर टीका करण्यात आली. त्यामुळे आता दोन्ही म्हणजेच फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचा हप्ता एकत्र जमा करण्यात असल्याची माहिती समोर आली आहे.

**मुंबई । प्रतिनिधी**

ग्रामीण नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे, मुख्यमंत्री बळीराजा वीजदरसवलत योजनेंतर्गत कृषिपंप ग्राहकांना वीजदर सवलत, केंद्र योजनेअंतर्गत रस्ते व पूल प्रकल्पांसाठी बिनव्याजी कर्जासाठी निधी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना, पुणे रिंग रोड, जालना नांदेड द्रुतगती महामार्गाच्या कामांना गती, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास बळीराजा जलसंजीवनी योजना, शासन अंशदान घटकाखाली विविध प्रकल्पांना निधी अशा लोकोपयोगी आणि राज्याच्या पायाभूत विकासाला बळकटी देण्यासाठी निधीची तरतूद असलेल्या ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या आणि निव्वळ भार ४ हजार २४५ कोटी ◀◀ पान २ वर

# महादेव मुंडेंच्या पत्नीचे उपोषण स्थगित

## अप्पर पोलिस अधिक्षक चेतना तिडके यांनी घेतली भेट; पोलिसांना एक महिन्याचा अल्टीमेटम



**बीड । प्रतिनिधी**

**परळी येथील महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपींना अटक करावी, या मागणीसाठी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे सोमवारपासून आमरण उपोषणाला बसल्या होत्या. बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्यांनी उपोषण सुरु केले होते. अप्पर पोलिस अधिक्षक चेतना तिडके यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन तपासाबाबत अश्वासन दिले. त्यानंतर एक महिन्याचे अल्टीमेटम देत ज्ञानेश्वरी मुंडे यांनी तुर्तास** ◀◀ पान २ वर

### काय म्हणाल्या ज्ञानेश्वरी मुंडे?

ज्ञानेश्वरी मुंडे म्हणाल्या की, एक महिन्यात आरोपीला अटक करू, असे आश्वासन दिले. त्यामुळे उपोषण स्थगित केले आहे. पोलीस अधीक्षकंवर आमचा विश्वास आहे. आमची मागणी मान्य झाली नाही तर उपोषण पुढे सुरू ठेवणार आहे. पोलीस अधीक्षक यांनी आश्वासन दिले आहे. त्यांच्या विश्वासाला मान देऊन एक महिन्याची मुदत दिली आहे. आता एक महिन्याचा कालावधी हा शेवटचा असणार आहे. एक महिन्यात आरोपीला अटक केली तर ठीक, नाहीतर पुन्हा उपोषण मात्र न्याय मिळत नाही तोपर्यंत लढत राहणार आहे. मस्साजोगच्या ग्रामस्थांचा मला पाठिंबा आहे. सुप्रिया सुळे यांचे सकाळपासून चार फोन आले आहेत. त्यामुळे त्यांचा मान ठेवून उपोषण तूर्तास स्थगित करत आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १५२.५० क्विंटल | २,५५१ | ३,२०० | २,८३२ |
| ज्वारी/हायब्रिड: १८२.५० क्विंटल | १,७०० | ३,८५१ | २,४९१ |
| मका/लोकल:२०.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर :२४.०० क्विंटल | ७,००० | ७,२३१ | ७,१५२ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,८०० | ३,२०२ | २,९६६ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: २७६.०० क्विंटल | २,९९१ | ४,०५० | ३,९०३ |
| हरभरा: ४०.५० क्विंटल | ५,२०० | ५,२३२ | ५,२०५ |

## आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांचे हस्ते होणार पहिले पूजन

**पुणे । प्रतिनिधी**

**पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनाला येणाऱ्या सर्वच भाविकांना आता लवकरच झटपट दर्शन मिळणार आहे. त्यासाठी तिरुपतीच्या धरतीवर केलेली टोकन दर्शन व्यवस्थेची सुरुवात आषाढी एकादशीला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते केली जाणार असल्याची माहिती मंदिर समितीकडून देण्यात आली आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार टीसीएस कंपनीकडून या व्यवस्थेचे सॉफ्टवेअर बनविण्यात आले आहे. या सॉफ्टवेअरबाबत मंदिर समिती सदस्य अधिकारी आणि टीसीएसच्या अधिकाऱ्यांमध्ये महत्त्वपूर्ण बैठक झाली आहे. या बैठकीत आषाढी एकादशी पूर्वी संपूर्ण टोकन दर्शन व्यवस्था पूर्ण होणार असून, आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्याच्या हस्ते याचा शुभारंभ केला जाईल, असे ठरले गेले. देशातील जवळपास नऊ ◀◀ पान २ वर

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा होणार?

# आजच्या सुनावणीकडे राज्याचे लक्ष

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीबाबतची सुनावणी मंगळवार, दि. ४ रोजी घ्यावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांचे वकील आणि सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात केली होती. त्यावर न्यायालयाने सकारात्मक भूमिका घेतली असून, ही सुनावणी मंगळवारी होणार आहे. ही याचिका दहाव्या क्रमांकावर असल्याने त्याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.**

मागील आठवड्यात २५ फेब्रुवारी रोजी ही सुनावणी होणार होती. ही याचिका सुनावणीच्या २९ व्या क्रमांकावर होती. मात्र, न्यायालयाचे कामकाज दुपारी १ पर्यंतच झाल्याने ८ व्या क्रमांकापर्यंतच्या याचिका न्यायालयाकडून ऐकण्यात आल्या. त्यानंतर कामकाज संपताना याचिकाकर्त्यांचे



वकील आणि सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी ४ मार्च ही तारीख मागितली. कोर्टाने त्यावर विचार करू, असे म्हटले होते. त्यानुसार दहाव्या क्रमांकावर ही याचिका आहे. या याचिकेत माजी विरोधीपक्ष नेते उज्ज्वल केसकर यांनी दाखल केलेली याचिकाही असून, केसकर यांचे वकील ॲड. श्रीरंग वर्मा यांनी ही माहिती दिली असल्याचे केसकर यांनी सांगितले. राज्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीन महिन्यांपूर्वी ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# दिशाहिन घोषणा अन् तारेवरची कसरत

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून मुंबई येथे सुरुवात झाली आहे. निवडणूक पूर्व काळामध्ये मतदारांना जी विविध प्रकारची आश्वासने देण्यात आली होती त्या आश्वासनांची पूर्ती करण्याच्या दिशेने या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये काही निर्णय घेतले जाणार आहेत का हे पाहणे यानिमित्ताने महत्त्वाचे ठरणार आहे. अनेक मोफत योजनांचा भार पडत असल्याने महाराष्ट्राची तिजोरी मोठ्या प्रमाणात हलकी झाली आहे आणि विविध प्रकारच्या योजनांना कात्रीही लावण्याचा विचार सुरू आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील मतदारांनी महायुतीच्या ज्या आश्वासनांवर विश्वास ठेवून महायुतीला सत्तेवर बसवले ती आश्वासने पूर्ण करायची असतील तर या अधिवेशनाच्या निमित्ताने महायुती सरकारला अर्थपूर्ण असे अर्थ नियोजन करावे लागणार आहे. ज्या लाडकी बहीण योजनेचा सर्वात मोठा फायदा होऊन महायुतीला सत्ता मिळाली त्या योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता अद्यापही महिलांच्या खात्यात जमा झालेला नाही. फेब्रुवारी आणि मार्च या दोन महिन्यांचे हप्ते एकदम महिला दिनी ८ मार्च रोजी दिले जातील असा खुलासा सरकारतर्फे सोमवारी केला गेला आहे.

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची महत्त्वाकांक्षी योजना असलेली आनंदाची शिधा ही योजनासुद्धा सरकारने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील महत्त्वाच्या सणांच्या निमित्ताने सर्वसामान्य नागरिकांना अत्यंत कमी दरात धान्य उपलब्ध करून देणारी ही योजनासुद्धा निधीच्या अभावी सरकारला गुंडाळावी लागली आहे. फक्त १०० रुपयांत तेल, रवा, डाळ आणि साखर देण्याच्या या योजनेसाठी प्रत्येक सणामागे साडेतीनशे कोटी रुपयांची तरतूद केली जात होती. आता ही योजना बंद करण्याच्या निमित्ताने किमान हजार कोटी रुपये वाचवण्याचा विचार सरकार करत आहे असे दिसते. ज्येष्ठ नागरिकांना मोफत तीर्थदर्शन घडवणारी योजनासुद्धा बंद करण्याचे संकेत मिळत आहेत. राज्य सरकारच्या परिवहन उपक्रमामध्ये म्हणजेच एसटी बसमध्ये ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना ज्या विविध सवलतीच्या योजनांची घोषणा करण्यात आली होती त्यांचाही विचार केला जाणार आहे असे दिसते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे लाडक्या बहीण योजनेला आता निकष लावले जात असून अनेक महिलांचे अर्ज बाद ठरवले आहेत. पात्र महिलांना पंधराशेच्या ऐवजी २१०० रुपये देण्यात येण्याची घोषणासुद्धा सरकारतर्फे करण्यात आली होती. या सर्व योजनांसाठी जर निधी उपलब्ध करायचा असेल तर सरकारला या अधिवेशनाच्या निमित्ताने काही कडक निर्णय घ्यावे लागतील असे दिसते. अर्थ खात्याची जबाबदारी असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांना नेहमीच सरकारच्या तिजोरीचे भान असते.

साहजिकच आता मतदारांना दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याचे आव्हान पेलतानाच नवीन कर योजना किंवा कर वाढ करताना सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही हेही अर्थमंत्र्यांना पहावे लागणार आहे. आगामी कालावधीमध्ये राज्यात अनेक ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याने त्याचा विचार करूनही या अधिवेशनामध्ये सरकारला आश्वासनाच्या पूर्तीबाबत काही निर्णय घ्यावे लागणार आहेत. निवडणुकीच्या कालावधीमध्ये किंवा त्यापूर्वी सरकारने विविध प्रकारच्या महामंडळांची घोषणा करून प्रशासकीय व्यापही वाढवून ठेवला आहे. या सर्व नवीन महामंडळांना निधी उपलब्ध करून देण्याचे आव्हानही सरकार समोर आहे. गेल्या काही कालावधीमध्ये शासकीय कंत्राटदारांच्या बिलांचे पेमेंट झालेले नाही असाही एक विषय समोर आला आहे. शिवाय सरकारी कार्यालयांमध्ये ज्या ठिकाणी आउटसोर्सिंग पद्धतीने काम करून घेतले जाते त्या कामाची बिलेसुद्धा पेंडिंग असल्याच्या बातम्या येत आहेत. साहजिकच या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सरकारला काही कडक निर्णय घेणे क्रमप्राप्त ठरणार आहे. केंद्र सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत असो किंवा जीएसटीसारख्या कराच्या उत्पन्नांत झालेली वाढ असो किंवा राज्य सरकारच्या अखत्यारीत असलेले अनेक छोटे कर असोत या सर्वांचा वापर करूनच सरकारला आपल्या तिजोरीचे नियोजन करावे लागणार आहे.

निवडणूकपूर्व काळामध्ये भरमसाठ आश्वासने देताना तिजोरीचा विचार केला गेला नसल्याने आता अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मात्र सरकारला वास्तवाचे भान ठेवावे लागणार आहे. ज्या घोषणांमुळे किंवा आश्वासनांमुळे महायुतीला सत्ता मिळाली त्यांचा विचार सरकारला करावाच लागणार आहे. खर्च आणि उत्पन्न यांचा ताळमेळ बसवताना अर्थमंत्र्यांना मोठ्या प्रमाणावर तारेवरची कसरत करावी लागणार आहे. सत्ताधारी आमदारांच्या तुलनेने विरोधी बाकांवरील आमदारांची संख्या कमी असली तरी योग्य मुद्द्यांच्या जोरावर कमी आमदारही सरकारला अडचणीत आणू शकतात हे नाकारता येणार नाही. अर्थात काही झाले तरी अर्थसंकल्पीय अधिवेशन हे सर्वात महत्त्वाचे असते. कारण त्यामध्ये राज्याचा अर्थसंकल्प मांडत असताना आगामी आर्थिक नियोजनाची दिशा ठरवली जात असते. राज्याचे बिघडलेले आर्थिक गणित दुरूस्त करण्याची चांगली संधी या निमित्ताने सरकारला उपलब्ध झाली आहे आणि म्हणूनच हे अर्थसंकल्पीय अधिवेशन अर्थपूर्ण असेल अशी आशा करायला हरकत नाही.

# शिक्षकांनी उत्कृष्ट शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी सदैव कार्यतत्पर रहा–शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे


**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

**शिक्षकांनी शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी सदैव कार्य तत्पर राहून गुणवत्ता विकास साधावा,त्यासाठी अधिक वेळ आपल्या कार्यासाठी द्यावा असे प्रतिपादन माध्यमिक विभागाचे बीड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी केले.जरेवाडी शाळेचे माजी मुख्याध्यापक तथा शिक्षण विस्तार अधिकारी गोविंद कदम यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून ते व्यासपीठावरून बोलत होते.**

यावेळी व्यासपीठावर बीड माध्यमिक विभागाचे शिक्षण अधिकारी नागनाथ शिंदे,पाटोदा गटशिक्षणाधिकारी धनंजय बोंदार्डे साहेब,विस्तार अधिकारी रामचंद्र सुळे,केजचे विस्तार अधिकारी ढाकणे,अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधीपती ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज,ह.भ.प.महेश मडके महाराज,पिंपळवंडीचे केंद्रप्रमुख नारायण नरसाळे सर,अंमळनेरचे केंद्रप्रमुख चंद्रकांत उकांडे सर,रमेश नागरगोजे,गोरे,खाडे,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार,सुनील जेधे, के.टी.पवार,चंद्रकांत पवार, अंमळनेरच्या सरपंच निलावती गाडे, महेश खेंगरे,अशोक जेधे,उध्दव पवार, तसेच आजी- माजी सरपंच,सदस्य उपस्थित होते. शिक्षक हा समाजातील अत्यंत महत्त्वाचा घटक असून शिक्षकांच्या उत्कृष्ट शैक्षणिक आणि समाज प्रबोधनपर कार्यामुळेच समाज जागृत होऊन योग्य दिशेने वाटचाल करत असतो असे

## • गोविंद कदम यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात

याप्रसंगी ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज यांनी उद्गार काढले.याप्रसंगी शाळेतील काही विद्यार्थी,केंद्रातील शिक्षक यांनी गोविंद कदम यांच्या शिक्षकी पेशातील,सेवेचे तसेच त्यांच्या शैक्षणिक कार्याविषयी आपले विचार व्यक्त केले.जरेवाडी शाळेत मला काम करण्याची संधी मिळाली आणि माझ्या जीवनाला खरा आकार प्राप्त झाला आणि आनंद मिळाला असे सत्काराला उत्तर देताना गोविंद कदम यांनी मनोगतात सांगीतले.यापुढे आपले शैक्षणिक कार्य चालूच राहील असे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी पिंपळवंडी,अंमळनेर, डोंगरकिन्ही परिसरातील सर्व आजी, माजी मुख्याध्यापक,सर्व शिक्षक बंधू, गोपीनाथ मुंडे पाटोदा तालुका शिक्षक पतसंस्थाचे अध्यक्ष,सचिव,उपाध्यक्ष तसेच संचालक,पत्रकार बांधव, जरेवाडी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंगद जरे परिसरातील बहुसंख्य ग्रामस्थ बंधू-भगिनी,कदम कुटुंबीयांचे आप्तेष्ट नातेवाईक,सगे सोयरे,मित्रमंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मल्हारी शिंदे सर यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पिंपळवंडी केंद्रातील सर्व शिक्षक,बंधू- भगिनींनी उत्कृष्ट नियोजन केले होते.उपस्थित सर्व शालेय विद्यार्थी व मान्यवर प्रमुख पाहुणे आणि सर्व ग्रामस्थ यांना कदम सर यांनी मिष्टान्न भोजन देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.



# तांत्रिक सहाय्यक किसन गायकवाड यांचा सेवापुर्ती सोहळा

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील किनगाव येथील भूमिपुत्र किसन खेमाजी गायकवाड हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, संभाजीनगर (महाराष्ट्र शासन) येथील कार्यालयात सन १९८७ पासून कार्यरत होते. ३४ वर्षाच्या शासकीय सेवेमधून ते दि.२८ फेब्रुवारी २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून अधिकारी कर्मचारी यांच्यामध्ये स्नेहभाव निर्माण केला होता. दरम्यान दि.२८ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संभाजीनगर येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये त्यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ संपन्न झाला.

सेवापुर्ती सोहळ्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे संभाजीनगर येथील चीफ इंजिनियर गावडे, कार्यकारी अभियंता रमेशचंद्र गिरी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सत्कारमूर्ती किसन गायकवाड व अभियंता नाईकवाडे यांना शाल श्रीफळ, पुष्प गुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विभागातील अधिकारी कर्मचारी यांनीही त्यांचा सत्कार करुन सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश शिरसे यांनी तर आभार असिस्टंट इंजिनियर दहीभाते यांनी व्यक्त केले. दरम्यान यावेळी गायकवाड यांचे सहकुटुंब सहपरिवार उपस्थित होते.

# महाबोधी महाविहाराचा ताबा फक्त बौद्धांनाच द्या

## प्रबुद्ध रंगभूमीचे राष्ट्रपतींना निवेदनाद्वारे मागणी



**कळंब। प्रतिनिधी**

**बिहार राज्यातील बुद्ध गया मंदिर कायदा - १९४९ रद्द करण्याबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना कळंब तहसीलदार हेमंत ढोकले यांच्यामार्फत दि.३ मार्च २०२५ वार सोमवार रोजी प्रबुद्ध रंगभूमी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने निवेदन देण्यात आले.**

बिहार राज्यातील बुद्धगया येथील महाबोधी विहाराला सदरील कायद्यान्वये मंदिर असा उल्लेख करण्यात आला आहे.या कायद्या अंतर्गत व्यवस्थापन समिती ९ सदस्यांची असली तरी त्यात ५ सदस्य हिंदू आणि ४ बौद्ध असा नियम आहे. हिंदूच्या ५ सदस्या पैकी हिंदू असणारा जिल्हाधिकारी अध्यक्ष आहे.परिणामी बाकी ४ बौद्ध सदस्याची गरजच नसल्याने हिंदू असणारा अध्यक्ष व ४ सदस्य मिळून सर्व निर्णय घेतात. महोदयांना विनंती की,बौद्धांचे धार्मिक स्थान असलेल्या बुद्धगया येथील बुद्ध गया मंदिर कायदा-१९४९ रद्द करून महाबोधी महाविहाराचा ताबा फक्त बौद्धांनाच द्यावा अशी विनंतीवजा मागणी केली आहे. या निवेदनात प्रबुद्ध रंगभूमी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सुभाष घोडके,सचिव प्रा. अविनाश घोडके,माजी नगरसेवक सुनील गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष किरण मस्के,कैलास गायकवाड,सुयोग गायकवाड,अरुण कांबळे,प्रविण गायकवाड,विशाल शिंदे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# रक्त तपासणी लॅब चालकाकडून होणारी लूट थांबविण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

**रूग्णाची अनावश्यक तपासणी च्या नावाखाली होत असलेली लुट रक्त तपासणी लॅब चालकाकडून होत असून ही थांबविण्यात यावे यासह शुल्क फलक दर्शनीय भागात लावावेत अशी मागणी अशासकीय सदस्य ग्राहक संरक्षण परिषद यांनी जिल्हाशल्य चिकित्सक डॉ राजेंद्र पाटील यांचे कडे निवेदन देऊन केली आहे .जिल्हा शल्यचिकित्सक पाटील यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की आपल्या अधिनीस्त येत असलेल्या खाजगी दवाखान्यात फी आकारणी बाबत मनमानी होत असल्यामुळे सामान्य रूग्णाची पिळवणूक होत असुन. जिल्ह्यातील तसेच अंबड शहरातील लॅब रक्त तपासणी. एम आर आय तपासणी फी यामध्ये दिवसा वेगळी आणि रात्री वेगळी फी आकारल्या जाते याबाबत फलक लावावेत अशी मागणी यावेळी करण्यात आली तसेच अंबड शहरातील खाजगी रक्त तपासणी लॅबची तपासणी करणे गरजेचे आहे . तपासणी केल्यास आरोग्य विभाग शासन नियमाप्रमाणे लॅब**




**नसल्याचे बोलल्या जात आहे. अंबड शहरातील लॅब चालक मर्जीप्रमाणे पैसे घेत आहे त्याची कोणतीही नियमाप्रमाणे पावती देण्यात नाही हा सर्व प्रकार जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दिसत नाही का याप्रकरणी लवकरात लवकर चौकशी करावी अशी पण मागणी पण होत आहे. असाच प्रकार जिल्ह्यामध्ये सुरू आहे. याप्रकरणी**

यावेळी अशासकीय सदस्य रमेश तारगे विजय जाधव संजय देशपांडे नंदकुमार देशपांडे अनंत वाघमारे जुमान चाऊस बाबासाहेब सोनटक्के डा स्वप्नील मंत्री दिनेश होलानी यांच्या सह.या आहेत दरम्यान जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी सांगितले की शासनाच्या आदेशानुसार याबाबत तपासणी सुरु आहे एक महिन्यात फी संदर्भात फलक लागतील असे आश्वासन दिले. दरम्यान या बाबत अधिक माहिती घेतली असता जिल्ह्यातील ५३५ खाजगी दवाखान्याची तपासणीचे पत्र दि २२ फेब्रुवारी रोजी काढले होते त्यानुसार फक्त १२४ दवाखान्याची तपासणी अहवाल प्राप्त असल्याचे समजते त्यामुळे आज दि ३ मार्च रोजी वैद्यकीय अधिक्षक व उपजिल्हा रुग्णालय लेखी पत्र देऊन महाराष्ट्र नर्सिंग अॅक्ट अंतर्गत नोंदणीकृत खाजगी सस्थाची पुनतपासणी करुन अहवाल सादर करणेबाबत आदेशीत केले आहे माननीय संचालक आरोग्य सेवा मुबंई आयुक्तालय यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार महाराष्ट्? नर्सिंग अॅक्ट अंतर्गत खाजगी शुश्रूषा गृह नोंदणी व पुन रनोंदणी करण्याच्या कामकाजामध्ये पारदर्शकता यावी करिता तपासणी करून अहवाल सादर करावा असे आदेशीत केले आहे ५३५ पैकी फक्त १२४ संस्थाना नोटीस दिल्या होत्या त्यामुळे परत तातडीने पत्र देऊन आपल्या अधिनीस्त नोटीस दिलेल्या दवाखान्याची एक महिन्यात तपासणी करून अहवाल सामान्य रूग्नालय जालना यांना सादर करावा असे लेखी पत्र दिले असुन माहितीस्तव आरोग्य संचालक मुबंई जिल्हाधिकारी जालना आरोग्य सचांलक संभाजीनगर यांना कळवले आहे या तपासणी अहवालातून फी निश्चिती यासह इतर सुविधा बाबत विविध मुद्यावर तपासणी करण्यात येणार आहे या माध्यमातून रुणाची होणारी पिळवणूक थांबेल अशी अपेक्षा आहे.

# खाजगी आयटीआय अनुदान समितीच्या तालुकाध्यक्ष प्रा.सुरज भांडे तर उपाध्यक्षपदी निदेशक राजकुमार शिंदे



**कळंब । प्रतिनिधी**

**धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या प्रेरणेने भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतीश मातने यांच्या मार्गदर्शनाखालील वेद शैक्षणिक संकुलातील भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सुरज भांडे यांची खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) अनुदान समितीच्या कळंब तालुकाध्यक्षपदी तर निदेशक राजकुमार शिंदे यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.**

या निवडीमुळे वेद शैक्षणिक संकुलनाच्या वतीने भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा.श्रीकांत पवार यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रा.मोहिनी शिंदे,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अविनाश घोडके,निदेशक अविनाश म्हेत्रे,निदेशक अर्जुन मंडाळे,आदित्य गायकवाड,दीक्षा गायकवाड,विनोद कसबे आदींची उपस्थिती होती. संस्थेच्या तालुक्यातील आयटीआय संस्थांच्या विकासासाठी नवी ऊर्जा मिळेल,अशी अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त होत आहे.

# पान १ वरून...

## शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या अन्यथा १९

दैनावस्था झाली असून त्यांना वारीस उरलेला नाही. या साऱ्या परिस्थितीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा आश्वासक चेहरा असलेल्या रविकांत तुपकर यांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेची स्थापना केली आहे. शेतकरी चळवळीतील आक्रमक तेवढाच विश्वासू चेहरा अशी तुपकर यांची ओळख असल्याने त्यांच्या एका हाकेवर क्रांतिकारी संघटनेच्या पहिल्या राज्य कार्यकारिणी बैठकीला सोमवारी (दि.०३) पुणे येथे शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यभरातून शेतकरी चळवळीतील ज्येष्ठ तसेच तरुण शेकडो शिलेदार बैठकीसाठी पुणे येथे आले होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी संघटनेची रूपरेषा, भूमिका आणि आगामी काळातील उद्देशाबाबत माहिती दिली. शेतकऱ्यांचा आवाज म्हणून क्रांतिकारी शेतकरी संघटना काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान तुपकर यांनी सत्ताधाऱ्यांच्या एकाधिकारशाही कारभारावर तुफान हल्ला चढवला. उत्पादन खर्च एवढाही भाव नसल्याने सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी मरणाच्या दारात येऊन ठेपला आहे असे सांगत राज्यात ६० लाख मेट्रिक टन सोयाबीनचे उत्पादन झालेले असताना सरकारने केवळ १२ ते १५ लाख मॅट्रिक टन एवढ्याच सोयाबीनची खरेदी केली आहे. ती खरेदी करताना उत्पादन खर्च एवढाही भाव दिला नाही. कापूस पिकाची हीच अवस्था आहे. कांदा उत्पादकांच्या डोळ्यात पाणी असून दुधाला दर नाही. सत्तेवर आलेल्या राज्यकर्त्यांनी निवडणुकीपूर्वी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. सत्तेवर येताच त्यांना दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला आहे. एवढा विसराळूपणा सत्ताधाऱ्यांना परवडणार नाही, असा इशारा दिला. दरम्यान नूतन पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना क्रांतिकारी शेतकरी संघटना हे केवळ संघटन नसून राज्यभरातील करोडो शेतकऱ्यांची वज्रमूठ असणार आहे. आपल्या सर्वांना मिळून शेतकऱ्यांच्या हक्काचा नैतिक लढा लढायचा आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राज्य पिंजून काढायचे आहे. शेतकऱ्यांच्या बाबतीत जो कोणी अन्याय करील त्याला अद्दल घडवण्यासाठी मागेपुढे पाहू नका, असे सांगून क्रांतिकारी शेतकरी संघटना शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढणार तर आहेच परंतु शेती, माती आणि मातीत राबणाऱ्या बळीराजाच्या घामाला योग्य मोबदला मिळवून द्यायचा आहे. शेतकऱ्यांसाठी राज्यभर मार्गदर्शन आणि प्रशिक्षण शिबीरे घ्यायची आहेत. शेतकऱ्यांच्या मुलांना चळवळीशी जोडायचे आहे. शेतकऱ्यांनी पिकवलेला माल मुंबईसारख्या मोठ्या बाजारात थेट शेतकऱ्यामार्फत विकायचा आहे. यासाठी कामाला लागा असे आवाहन तुपकर यांनी संघटनेच्या राज्यभरातील नवीन पदाधिकाऱ्यांना केले. दरम्यान, राज्याकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या सहनशिलतेची सत्वपरीक्षा न पाहता निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार कर्जमाफी करावी. सध्या अधिवेशन सुरू असून १८ मार्चपर्यंत कर्जमाफी न दिल्यास आरपारची लढाई लढणार आहे. १८ मार्चपर्यंत सरकारला वेळ देत आहोत. या कालावधीपर्यंत आमच्या मागण्या मान्य न झाल्यास, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी न झाल्यास १९ मार्च रोजी मुंबईत आंदोलनाचा बॉम्ब फोडू असा गंभीर इशारा यावेळी रविकांत तुपकर यांनी दिला. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शेतकरी गाड्या भरून १८ मार्च रोजी मुंबईकडे निघून १९ मार्च रोजी मुंबईत धडक देतील असे रविकांत तुपकर म्हणाले. यांनी परंतु त्यांनी कोणते आंदोलन करणार आणि मुंबईत नेमके कुठे करणार याबाबत काहीच सांगितले नाही. यामुळे १९ मार्चला रविकांत तुपकर आणि त्यांची क्रांतिकारी शेतकरी संघटना मुंबईत नेमका कोणता धमाका करते याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. यावेळी प्रसिद्ध व्याख्याते प्रा.यशवंत गोसावी, गजानन अहमदाबादकर, राजकुमार कसबे, राजाभाऊ देशमुख, अंबादास कोरडे, लक्ष्मण मोरे, गजानन कावरखे, नामदेव पतंगे, चंद्रशेखर गवळी, भगवान शिंदे, सत्तार पटेल, ज्ञानेश्वर टाले, नारायण लोखंडे यांच्यासह राज्यभराच्या कानाकोपऱ्यातून शेतकरी चळवळीतील नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

**जेष्ठ कार्यकर्त्याने रविकांत तुपकरांसाठी खमिसाच्या खिशात आणली चटणी भाकरी**

क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पहिल्या राज्य कार्यकारणी बैठकीत राज्यभरातून ज्येष्ठ तसेच तरुण शिलेदार मोठ्या संख्येने आले होते. नगर येथील जेष्ठ कार्यकर्ते अंबादास कोरडे यांनी खास रविकांत तुपकर यांच्यासाठी प्रेमाने खमिसाच्या खिशात ठेचा भाकरीची शिदोरी आणली. कार्यक्रम सुरू असताना व्यासपीठावरच त्यांनी खिशातून भाकरीची छोटीशी पिशवी काढत रविकांत तुपकर यांच्या हाती दिली. यावेळी तुपकर गहिवरून गेले होते. त्यांनी आपल्या भाषणात गेल्या वीस वर्षापासून जिथे कुठे कार्यक्रम अथवा आंदोलन, मोर्चा असेल त्यावेळी ८० वर्षीय अंबादास कोरडे घरून निघताना माझ्यासाठी न विसरता घरून भाकरी बांधून आणतात, असे सांगितले. या प्रसंगातून शेतकरी चळवळीतील तरुणच नव्हे तर ज्येष्ठ कार्यकर्त्यांचाही रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वावर प्रचंड विश्वास असल्याचे दिसून आले.

------------

## महाराष्ट्र में दोही गुंडे..

राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. अधिवेशन सुरु असताना विधीमंडळ परिसरात विरोधकांनी महाराष्ट्र में दोही गुंडे..कोकाटे और मुंडे असे म्हणत दोघांच्या राजीनाम्याचा विषय लावून धरला. त्यामुळे या अधिवेशनात मुंडे आणि कोकाटे यांचा मुख्यमंत्री राजीनामा घेतला जाईल का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

------------

## महादेव मुंडेंच्या पत्नीचे

उपोषण स्थगित केले आहे. महादेव मुंडे प्रकरणाचा तपास तात्काळ एसआयटी आणि सीआयडीकडे दाखल करावा. खुनाच्या कटात ज्यांनी फोन केले त्या आरोपींचे सीडीआर काढावेत. महादेव मुंडे यांच्या आरोपींना तात्काळ अटक करावी, या ३ प्रमुख मागण्यांसाठी ज्ञानेश्वरी मुंडे यांच्याकडून आमरण उपोषण केले जात होते. ज्ञानेश्वरी मुंडे यांच्या उपोषणाला मस्साजोग येथील ग्रामस्थांनीही पाठिंबा दिला होता. आता अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्याकडून मुंडे कुटुंबियांना आरोपींना करण्याचे आश्वासन देण्यात आल्यानंतर त्यांनी आपले आमरण उपोषण तूर्तास स्थगित केले आहे.

------------

## अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी

९४ लाख रुपये असलेल्या पुरवणी मागण्या सोमवारी विधीमंडळात सादर करण्यात आल्या. सोमवारपासून सुरु झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी वर्ष २०२४-२५ च्या पुरवणी मागण्या विधानसभेत सादर केल्या. सादर केलेल्या ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांपैकी ९३२.५४ कोटींच्या मागण्या अनिवार्य, ३,४२०.४१ कोटींच्या मागण्या कार्यक्रमांतर्गत आणि २,१३३.२५ कोटी रुपयांच्या रकमा केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने सादर करण्या आल्या आहेत. ६,४८६.२० कोटींच्या स्थूल पुरवणी मागण्या असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष निव्वळ भार हा. ४,२४५.९४ कोटी रुपये आहे. पूरक मागणीद्वारे, सरकार अर्थसंकल्पीय वाटपाव्यतिरिक्त अतिरिक्त निधीची मागणी करते.

------------

## आजच्या सुनावणीकडे

शासन स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांबाबत गंभीर असून, एप्रिल अथवा मे महिन्यात या निवडणुका होण्यासाठी शासन न्यायालयास विनंती करणार असल्याचे सूतेवाच केले होते. त्यामुळे मागील तीन ते चार वर्षांपासून निवडणुकांच्या प्रतीक्षेत असलेल्या इच्छुकांनी मागील तीन महिने जोरदार तयारी सुरू केली होती. त्यानंतर काही दिवसांपूर्वीच एका कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, हे आता एआय पण सांगू शकत नाही, असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे निवडणुका आणखी लांबणीवर पडतील, असे वातावरण तयार झाले होते. मात्र, पुन्हा सुनावणीची तारीख मिळाल्याने राज्यभरात उत्सुकता वाढली आहे.

------------

## आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांचे

मोठ्या देवस्थानात टीसीएस कंपनीकडून या दर्शन व्यवस्थेचे सॉफ्टवेअर देण्यात आले असून, या ठिकाणी गेल्या काही वर्षापासून अतिशय सुरळीतपणे टोकन दर्शन व्यवस्था राबविण्यात येत आहे. हे टोकन दर्शन व्यवस्था सॉफ्टवेअर बनविताना पंढरपुरातील मोठ्या यात्रा सणांचे दिवस आणि इतर महत्त्वाच्या गर्दीच्या दिवसांचा विचार या सॉफ्टवेअरमध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे पंढरपूरला येणाऱ्या भाविकांना दर्शनासाठीचे टोकन घ्यावे लागणार असून, यावेळेस त्यांना दर्शनाची तारीख आणि वेळ हे टोकन वरुन दिले जाणार आहे. याचवेळेत येऊन या भाविकांना देवाचे दर्शन केवळ दीड ते दोन तासात घेता येणार आहे. याबाबतचे नियोजन करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि पोलिस अधीक्षक यांच्यासोबत १५ दिवसांत जिल्हा प्रशासनाची बैठक होणार आहे.

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. ४ मार्च २०२५

३

## देवडा बँकेने पैशासोबत माणसे सांभाळली –रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी**

**जे पैसे सांभाळतात ते माणसे सांभाळू शकत नाहीत अशी उदाहरणे आपण नेहमी पाहतो. मात्र ओमप्रकाश देवडा पीपल्स को–ऑप. बँकेच्या माध्यमातून देवडा परिवार आणि संचालकांनी पैसा आणि माणसे ही सांभाळली असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.**

ओमप्रकाश देवडा पीपल्स को– ऑप. बँकेच्या नूतन इमारत शुभारंभ प्रसंगी दानवे बोलत होते. माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण, माजी राज्यमंत्री ललित गांधी, आरबीआय चे संचालक सतीश मराठे, आ. तान्हाजी मुटकुळे, रामराव वडकुते, बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा,पालक संचालक नरेंद्र मोदी,जालना स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष विजय कामड, मोतीराम अग्रवाल मर्चंट बंकेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल, जे. पी. सी. बैंकेचे अध्यक्ष संजय मुथा, बंकेचे सदस्य विजय बगड़िया ,पुरूषोत्तम अग्रवाल ,अर्जुन गेही, प्रमोद मुथा,मु.का.अ.सुधीर जालनापुरे, सहा. सरव्यवस्थापक संजय गवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. खा. अशोक चव्हाण यांनी उद्योगांना सहकार क्षेत्राचे बळ मिळणे गरजेचे असून नव उद्योजकांना उभे राहण्यासाठी सहकारी बँकांनी पाठबळ द्यायला हवे. असे मत खा. चव्हाण यांनी व्यक्त केले. या प्रसंगी सहकाररत्न स्व. देवडा यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी बंकेचे संचालक, सभासद, उद्योजक, व्यापारी, विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# अपयशात दडले आहे यशाचे सूत्र –डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**पालक आपल्या मुलांना फक्त यशाला सामोरे जायला शिकवितात परंतु, अपयश आले तर काय..? याची मात्र तयारी त्यांच्याकडून करून घेत नाहीत त्यामुळे ज्यावेळी विद्यार्थ्यांना अपयश येते ते स्वीकारण्याची आणि पचविण्याची त्यांची मानसिकता नसते त्यामुळे विद्यार्थी निराशेच्या गर्तेत जाऊन त्यांचा आत्मविश्वास खचतो. त्यामुळे यशस्वी झालेल्या लोकांच्या कथा वाचण्यापेक्षा अपयशाच्या कथा वाचल्या पाहिजेत. कारण, अपयशाचे हेच अनुभव त्या विद्यार्थ्याला यश कसे मिळवावे याचे सूत्र शिकवितात असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी केले.**

येथील संजीवन एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर एँम्पाच्या अध्यक्षा डॉ.सुलभा पाटील, डॉ.सागर कुलकर्णी, ऍड.संतोष पवार, संस्थेच्या सचिव डॉ.योगिनी नागरगोजे, संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर नागरगोजे, मुख्याध्यापक शेख मुक्तार व जयराम विघ्ने महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.इंगोले यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक पालक सजग झाला आहे. पालकाला आपला पाल्य ह्या गुणांच्या जीवघेण्या स्पर्धेत सर्वात पुढे असावा ही अपेक्षा असते किंबहुना आपली राहिलेली अपुरी स्वप्ने, इच्छा, आकांक्षा ते बळजबरीने विद्यार्थ्यांवर लादण्याचा प्रयत्न करतात. हे अपेक्षांचं ओझच आपल्या पाल्याला कळत नकळत कमकुवत बनवत आहेत याची जाणीव पालकांना नसते. या अपेक्षा




त्यांच्यावर लादण्यापेक्षा त्यांच्याशी संवाद वाढवला, त्यांच्यातील सुप्तगुणांना हेरले, त्याचा कल कुणीकडे आहे हे तपासले, त्याचा आवडीचा विषय आणि भविष्यातील करीयर याचा जर ताळमेळ पालकांना राखता आला तर आपला पाल्य निश्चितपणे त्याच्या आवडीच्या क्षेत्रात यशाचे शिखर गाठू शकतो. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच माणुसकीचे संस्कार आणि मूल्य दिले तरच त्या शिक्षणाला अर्थ प्राप्त होतो अन्यथा ते शिक्षण मूल्यहीन असले तर त्याचा त्या व्यक्तीला, कुटुंबाला, समाजाला, राष्ट्राला कसलाच उपयोग होत नाही. सध्याचे शिक्षण हे नौकरी केंद्रित असल्याने ही खंत व्यक्त करीत आणि सध्या जे बदल शिक्षण क्षेत्रात होत आहेत त्याचा समाजावर आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत दूरगामी परिणाम होणार असल्याचे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. सध्याची सामाजीक परिस्थिती ही दुर्दैवी असल्याची खंत व्यक्त करीत जाती, धर्म, गरीब, श्रीमंत ही दरी समाजामध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेवर याचा वाईट परिणाम होत आहे त्यामुळे माणूस माणसाला जोडणारी संविधानाप्रति आदर ठेवणारी शिक्षण प्रणाली ही काळाची गरज असल्याचे मत डॉ.राजेश इंगोले यांनी मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.योगिनी नागरगोजे यांनी करतांना संस्था ही समाजातील सर्वस्तरांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करत आहे. या शिक्षणासोबतच हे विद्यार्थी माणूस म्हणून घडले पाहिजेत याकडे संस्था कटाक्षाने लक्ष देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी प्रयत्न करते असे सांगितले. डॉ.सागर कुलकर्णी यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि पालक हे तीन चाके असून यातल्या एकाही चाकाने व्यवस्थित कार्य केले नाही. तर आयुष्याची गाडी व्यवस्थित चालणार नाही असे सूतोवाच करीत पालकाने आपल्या पाल्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे असे मत मांडले. यावेळी ऍड.संतोष पवार यांनीही विद्यार्थ्यांनी शिकून मोठे होऊन आपणही समाजाचे राष्ट्राचे देणे लागतोत या भावनेने उपेक्षित आणि गरजवंतांची मदत केली पाहिजे ही अपेक्षा व्यक्त केली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले आणि मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्य कला सादर करीत उपस्थितांची दाद मिळविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक शेख मुक्तार यांनी केले तर उपस्थितांचे आभार ज्ञानेश्वर नागरगोजे यांनी मानले.

## योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या तारांगण प्रकल्पाचे उद्‌घाटन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्रांतर्गत तारांगण प्रकल्पाचे उद्घाटन नुकतेच संपन्न झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुरेश खुरसाळे होते तर कार्यक्रमासाठी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर,गणपत व्यास,कमलाकर चौसाळकर आदी उपस्थित होते.



यावेळी बोलताना एल.के.कुलकर्णी म्हणाले की,आकाश निरीक्षणात ज्ञानप्राप्तीची सार्थकता असते अंबाजोगाईत तारांगण प्रकल्प साकारला, ही बाब मराठवाड्याच्या दृष्टीने क्रांतिकारक दिवस आहे योगेश्वरी संस्थेने हे पाऊल उचलले याचा आनंद आहे. संशोधनासाठी मोठ्याच बाबी असाव्या लागतात असे नाही. छोट्या बाबींमधून देखील संशोधन करता येते. प्रत्येक बाबीची चिकित्सा करा. तारांगणातून मिळणारी माहिती पुढील पिढीला देखील महत्वपूर्ण व ज्ञान वाढवणारी आहे. या केंद्राबरोबरच येथे खगोल शास्त्रावरील पुस्तकांचे प्रदर्शन व विक्री केंद्र व्हावे, आकाश निरीक्षण मंडळ व्हावे अशा अपेक्षा कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या. तारांगणामुळे शिक्षणाला जिवंतपणा येणार आहे. लोकांमध्ये असलेला आकाशाकडे बघण्याचा दृष्टिकोन वळवण्याचा प्रयत्न या प्रकल्पाच्या माध्यमातून होईल. यातून काही गोष्टी स्वतः शोधून काढल्याचा आनंद मुलांना झाला पाहिजे अशी आशा हेमंत मोने यांनी व्यक्त केली.

डॉ.खुरसाळे म्हणाले की,अनेकांच्या सहभागातून हा तारांगणाचा प्रकल्प साकार झाला आहे. ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाची सोय होण्यासाठी थोर स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद यांनी योगेश्वरी महाविद्यालय सुरु केले. हीच गरज ओळखून विज्ञान केंद्र व तारांगण सुरू केल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी,संचालक, कर्मचारी, इतर नागरिक उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून आजच्या युगाला सामोरे जावे – प्राचार्या वेदिका चाळक

गेवराई । प्रतिनिधी

देशाच्या विकासासाठी वैज्ञानिक विचारांचा प्रसार आवश्यक आहे. राष्ट्रीय विज्ञान दिनासारखे कार्यक्रम वैज्ञानिक वृत्तीचा प्रसार करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरतात. विज्ञानाच्या माध्यमातूनच आपण समाजातील लोकांचे जीवनमान अधिकाधिक सुखी करु शकतो व विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरुकता निर्माण करणे आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो तर विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून आजच्या युगाला सामोरे जायला हवे असे प्रतिपादन प्राचार्या श्रीमती वेदिका चाळक यांनी व्यक्त केले.



राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून गेवराई शहरातील किंगसन ग्लोबल स्कूल या शाळेत वैज्ञानिक प्रयोग सादर करुन विज्ञान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन पांडुरंग गावडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक श्याम चाळक, काकासाहेब काळे, सिरसाठ , अमोल आमले, महादेव पवार, तात्यासाहेब पठाडे, विजय डवणे उपस्थित होते. सर्वप्रथम शास्त्रज्ञ सी.वी.रमन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी इयत्ता पहिली ते सहावी या वर्गातील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण केले व मान्यवरांना माहिती दिली. प्रयोगांमध्ये मुख्यतः सोलार पॉवर, पवन ऊर्जा, वॉटर सायकल, न्यूटन लॉ, वाटर फिल्टरेशन, सोलार कार, किडनी फंक्शन, चंद्रयान, सोलर सिस्टिम, सेन्स ऑर्गन, सेव अर्थ अशा विविध प्रकारच्या जीवन उपयोगी प्रयोगाचे सादरीकरण मांडणी केली. यशस्वीतेसाठी विज्ञान विषयाच्या शिक्षिका पाठक, स्वाती मिसाळ, कुलकर्णी, ज्योती अतकरे , वैशाली, ज्योती पंडित, भोसले, गायत्री , तब्बसुम , ज्योती मुंडे , पवार , नम्रता वराट , शारदा पवार, तात्यासाहेब पठाडे यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार

गोरे यांची सांत्वन केले.मंत्री महोदयांची सरपंच परिषदेचे पदाधिकारी यांनी बोराटवाडी येथे आज रविवारी भेट घेतली.स्व. भगवानराव रामचंद्र गोरे हे परिसरात ''दादा '' नावाने परिचित होते. परिसरातील सर्व शहरी आणि ग्रामीण भागातील जनता त्यांना '' दादा '' या टोपण नावाने अत्यंत स्नेहपूर्वक आणि आदराने बोलत असे.बोराटवाडी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन असताना त्यांनी शेतकरी सर्वसामान्य जनता आणि ग्रामस्थ यांची अत्यंत प्रमाणिक आणि मनोभावे सेवा केली.सातारा जिल्हा रेशनींग दुकानदार संघटनेच्या माध्यमातून त्यांनी रेशनींग दुकानदारांचे प्रश्न मार्गी लावले आहेत.त्यांचा स्वभाव शांत, संयमी,धार्मिक आणि समाज सेवेला प्रेरीत असा होता.शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे.महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांची आज रविवारी भेट घेत दादांच्या अनेक आठवणींना यावेळी उजाळा देण्यात आला.

### अखिल भारतीय महात्मा फुले

समाजाचे नेते जी.जी.चव्हाण, माजी आमदार पांडुरंग अभंग, शंकरराव लिंगे, डॉ. कैलास कमोद, मराठा समाजाचे नेते शिवाजीराव नलावडे, सौ.पार्वतीताई शिरसाठ, अंबादास गारुडकर, कुणबी समाजाचे नेते प्रा.दिवाकर गमे, दलित समाजाचे नेते बाळासाहेब कर्डक, ॲड. राजेंद्र महाडोळे , लोणारी समाजाचे नेते डॉ. सुदर्शन घेराडे, प्रदेश चिटणीसपदी डॉ. गणेश खारकर, किशोर कन्हेरे, डॉ. डी. एन. महाजन, विणकर समाजाचे नेते सुनील मेटे, समाधान जेजुरकर, नाभिक समाजाचे नेते अनिल निकम, धनगर समाजाच्या नेत्या डॉ.स्नेहा सोनकाटे, ओबीसी समाजाचे नेते कैलास मुदलीयार, प्रदेश संघटकपदी प्रा.रवींद्र खरात तर प्रदेश प्रचारकपदी डॉ. नागेश गवळी, प्रा. संतोष विरकर, ढोर समाजाचे नेते मुकुंद सोनटक्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### पाटोदा डिजिटल मीडिया

यूट्यूब चैनल, इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, व्हाट्सअप, ऑनलाइन दैनिक यासह वेगवेगळ्या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून शेकडो पत्रकार काम करत आहेत. त्यांना संघटित करून योग्य दिशेने आणि सुसूत्र पद्धतीने डिजिटल मीडियाचे काम व्हावे. त्यासोबतच या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकाराला सुरक्षा देऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी डिजिटल मीडिया परिषद काम करत आहे. यासाठी पाटोदा तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी करून नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# मराठी पत्रकार परिषद पाटोदा शाखेच्या वतीने एक दिवसीय लाक्षणिक उपोषण

### एस टी आगाराच्या संदर्भात विविध मागण्या; पालक अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण स्थगित –पत्रकार परिषदेच्या लढ्याला यश

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील पत्रकारांची अग्रही संघटना असलेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या पाटोदा शाखेच्या वतीने एस टी संदर्भातील विविध मागण्यांसाठी पाटोदा आगारात एकदिवसीय लाक्षणीक उपोषण करण्यात आले. बीड जिल्ह्यातील महत्वाचे असणारे पाटोदा आगार.पण हेच हल्ली नावापुरते च मर्यादित राहू लागले आहे.येथील आगारात ४८ बस आहेत पण त्याही ही फक्त नावालाच.त्यांतील जवळपास ८०% बसेस भंगारात जमा होण्यासारख्या आहेत.या आगारात बाहेरील स्थानकाच्या देखील बस येत नाहीत. त्या ही चुंबळी फाटा



मार्गे जातात.म्हणून पाटोदा आगार म्हणजे असून अडचण नसून खोळंबा असाच काहीसा प्रकार झाला आहे. सोबतच पाटोदा आगारातील वाहतूक नियंत्रक कक्ष ही रात्रीचा बंदच असतो. यामुळे रात्रीचा काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच मराठी पत्रकार परिषद पाटोदा च्या वतीने सोमवारी पाटोदा आगारात एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले.यामध्ये बीड वरून नगर,पुणे,मुंबई या ठिकाणी जाणाऱ्या गाड्या चुंबळी फाट्यावरून न जाता त्या पाटोदा आगारात याव्यात तसेच आगारातील वाहतूक नियंत्रक कक्ष रात्रभर सुरू ठेवावा या दोन मुख्यतः मागण्या करण्यात आल्या होत्या.

**मराठी पत्रकार परिषदेच्या आंदोलनास यश–पाटोदा शाखेचे जनतेकडून कौतुक**

पाटोदा वाशीयांच्या जिव्हाळ्याचा विषय उचलून धरल्याने अन त्यांवर लागलीच तोडगा निघाल्याने पाटोदा शहरातील नागरिकांकडून मराठी पत्रकार परिषदेच्या पाटोदा शाखेचे कौतुक केले जात आहे.

भुसारी साहेबांच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण स्थगित

पाटोदा आगाराचे पालक अधिकारी अमोल भुसारी साहेब यांनी बीड वरून येत पाटोदा आगाराचे डेपो मॅनेजर खेडकर यांच्यासह उपोषणस्थळी भेट दिली.यावेळी त्यांनी उपोषण करणाऱ्या पत्रकारांसोबत सविस्तर चर्चा करत येत्या ४ दिवसांत मागण्या मान्य करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यांनतर उपोषण स्थगित करण्यात आले. या उपोषणासाठी मराठी पत्रकार परिषदेचे पाटोदा तालुकाध्यक्ष अजय जोशी,तालुका कार्याध्यक्ष प्रा.सोमीनाथ खंडागळे, सचिव हमीद खान पठाण,जेष्ठ पत्रकार दयानंद सोनवणे,कादर मकराणी पाटोदा चे माजी सरपंच परमेश्वर अडागळे,जावेद शेख,उपाध्यक्ष अशोक भवर, सतीश गर्जे, सतीश उबाळे,टेकाळे सर,आदि.उपस्थित होते.

**टी सी मार्क मेमो जात प्रमाणपत्र वैधता प्रमाणपत्र हरवले आहे**

मी सिद्धेश्वर रामदास कूमरे रा. गोंदी ता. अंबड जि. जालना

मी कै.विमलबाई गंगाधर गायकवाड माध्य व उच्च विद्यालय गायकवाड जळगाव , तालुका. शेवगाव , जी. अहमदनगर येथे शिकत होतो २०१९–२० मध्ये माझे १२ वी पास ची टि.सी. , १२ वी पास चा मार्क मेमो , जात प्रमाण पत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र हे जाफराबाद ते जालना प्रवासा दरम्यान गहाळ झाले आहे .सापडल्यास या नंबरला संपर्क करणे

**संपर्क मो. ७४४७३२२७६१**

# अंबाजोगाईत १५ मार्च रोजी ॲल्युमिनियम मॅन इंजि.भरत गित्ते यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा

## नगरभूषण पुरस्कार उद्योजक लक्ष्मणराव मोरे यांना, सद्भावना पुरस्कार सतीश बनसोडे यांना तर युवा गौरव पुरस्कार सुजित दिख्खत (ठाकूर) यांना जाहीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

माध्यम क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटविलेल्या मुद्रित व इलेक्ट्रॉनिक मीडियात स्वतःची वेगळी ओळख बनवलेल्या दैनिक वार्ता समूहाचा १७ वा वर्धापन दिन सोहळा शनिवार दि.१५ मार्च २०२५ रोजी सायं.५.०० वा.अंबाजोगाई येथे श्री मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, नगरपरिषद अंबाजोगाई या ठिकाणी संपन्न होणार आहे.या निमित्ताने अल्युमिनियम क्षेत्रात ज्यांची जगभर कीर्ती आहे असे ॲल्युमिनियम मॅन म्हणून ओळख निर्माण केलेले जर्मनी येथील उद्योजक व बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र इंजि.भरत केशवराव गित्ते यांचा जाहीर सत्कार यानिमित्ताने आयोजित केला आहे. तर वार्ता समूहाच्या पुरस्काराचे वितरण त्यांच्याच हस्ते होणार आहे. दैनिक वार्ता समूहाचे यंदाचे पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आलेले आहेत.ज्यामध्ये नगरभूषण पुरस्कार हा महाराष्ट्रातील प्रख्यात उद्योजक लक्ष्मणराव मोरे यांना सद्भावना पुरस्कार हा अंबाजोगाईचे भूमिपुत्र व सेलू जि.परभणी येथील दुय्यम निबंधक वर्ग २ सतीश बनसोडे यांना तर युवा गौरव पुरस्कार हा अंबाजोगाईतील युवा उद्योजक सुजित दिख्खत (ठाकूर) यांना जाहीर झाला असून मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. अशी माहिती दैनिक वार्ता समूहाचे संपादक परमेश्वर गित्ते यांनी दिली आहे.

दैनिक वार्ता समूह हा गेल्या १७ वर्षापासून माध्यम क्षेत्रात भरीव असे कार्य करत आहे.गेल्या १७ वर्षात सामाजिक दृष्ट्या आपली जबाबदारी ओळखून आपले कर्तव्य अदा केले आहे. माध्यम क्षेत्रात काम करत असताना मुद्रित माध्यम असो की इलेक्ट्रॉनिक मीडिया असो यात वार्ता समूहाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. वर्धापन दिनाच्या निमित्ताने भूमिपुत्रांचा गौरव आणि सन्मान केला जातो अंबाजोगाईचे भूमिपुत्र जे

हस्ते



मा.इंजि.भरत गित्ते

नगरभुषण पुरस्कार



मा.लक्ष्मणराव मोरे

सदभावना पुरस्कार



मा.सतिष बनसोडे

युवा गौरव पुरस्कार



मा.सुजित दिख्खत

राज्यभर असो की देशभर किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपआपल्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करत आहेत अशांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यंदा २०२५ चे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. ज्यामध्ये नगरभूषण पुरस्कार हा मोरेवाडीचे भूमिपुत्र लक्ष्मणराव मोरे यांना जाहीर करण्यात आला आहे. लक्ष्मणराव मोरे हे साखर उद्योगातील विश्वसनीय नाव आहे. केज येथील गंगा माऊली साखर कारखाना ते स्वतः चालवत आहेत. उद्योजक म्हणून त्यांना संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जाते. तसेच सतीश बनसोडे यांना सद्भावना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.सतीश बनसोडे हे अंबाजोगाईचे भूमिपुत्र असून ते सेलू जि.परभणी येथे दुय्यम निबंधक वर्ग २ या पदावर कार्यरत आहेत. अंबाजोगाई व परिसरात त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात काम केले आहे. विविध चळवळीशी ते एकरूप झालेले आहेत तर युवा गौरव पुरस्कार हा अंबाजोगाई येथील युवा उद्योजक व हॉटेल साई पॅलेस चे मालक सुजितसिंह उदयसिंह दिख्खत (ठाकूर) यांना जाहीर करण्यात आला आहे. सुजित दिख्खत (ठाकूर) हे हॉटेल व्यवसाय आणि कन्स्ट्रक्शन व्यवसायातील यशस्वी उद्योजक आहेत. त्यासोबतच सामाजिक क्षेत्रात त्यांचे भरीव असे कार्य आहे. या पुरस्काराचे वितरण शनिवार दि. १५ मार्च रोजी सायं. ५.३० , वा.अंबाजोगाई येथील श्री मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, नगरपरिषद अंबाजोगाई या ठिकाणी होणार आहे. या कार्यक्रमात जगविख्यात उद्योजक व ॲल्युमिनियम मॅन म्हणून ओळख असलेले व टोरल इंडिया कंपनीचे मुख्य प्रवर्तक इंजि. भरत केशवराव गित्ते यांच्या यांच्या हस्ते मान्यवरांचा जाहीर सत्कार होणार आहे .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाने अंबाजोगाई पीपल्स बँकेचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी हे राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, परभणी येथील जायकवाडी प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता प्रसाद लांब, केजच्या नगराध्यक्ष.सौ सीताताई बनसोड, जनविकास परिवर्तन आघाडीचे संस्थापक हरूनभाई इनामदार,अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाईचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. बी. आय. खडकभावी, अंबाजोगाई येथील उद्योजक प्रतापराव पवार, आयएमए अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे, पुणे येथील प्रसिद्ध डॉ. सचिन नागापूरकर, परळी येथील सामाजिक कार्यकर्ते राजेभाऊ फड, प्रा.ईश्वर मुंडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहे. याच कार्यक्रमात एमपीएसडी परीक्षेत उत्तीर्ण झालेले इंजी.श्रीनाथ गीते व इंजी .सुमित राजाभाऊ लोमटे यांचा विशेष सत्कार केला जाणार आहे. तरी या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन दैनिक वार्ता समूहाचे संपादक परमेश्वर गित्ते ,अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ, तालुका पत्रकार संघ तालुका अंबाजोगाई, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ शाखा अंबाजोगाई, अ .भा. म .पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई, गुड मॉर्निंग ग्रुप अंबाजोगाई, अ.भा.म. प. डिजिटल मीडिया शाखा अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.तरी या कार्यक्रमास बहुसंख्य नागरिक बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.





# पपईचा बाजारभाव टिकून; तूर, कारली, कापूस तसेच काय आहे सोयाबीन भाव

राज्यासह देशातील बाजारात सध्या तुरीची आवक वाढत आहे. राज्यात सरकारने हमीभावाने तूर खरेदीला मान्याता दिली. नोंदणीही सुरु झाली. मात्र प्रत्यक्ष खरेदी अजूनही बहुतांशी भागात सुरु झाली नाही. त्याचा काहीसा दबाव बाजारावर दिसत आहे. बाजारातील आवक वाढ असल्याने दरही स्थिर दिसत आहेत. सध्या तुरीला सरासरी ७ हजार ते ७ हजार ३०० रुपयांचा भाव दिसत आहे. बाजारातील आवक पुढच्या काळात आणखी वाढणार आहे. त्यामुळे तुरीचा बाजार काही आठवडे तरी हमीभावाच्या खाली राहू शकतो, असा अंदाज तूर बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

राज्यातील पपईला सध्या चांगली मागणी आहे. त्यामुळे पपईच्या भावातील तेजी टिकून आहे. पपईचे वाढलेले भाव मागील काही दिवसांपासून स्थिर आहेत. वाढती उष्णता आणि सणामुळे पपईला चांगला उठाव आहे. मात्र बाजारातील पपईची आवक मर्यादीत आहे. राज्यातील पपई सध्या देशभरात जात आहे. त्यामुळे पपईला सध्या १७०० ते २ हजार रुपयांचा भाव मिळत आहे. यंदा पपईची लागवड सरासरीपेक्षा कमीच होती. त्यामुळे आवकही मर्यादीत आहे. पपईचा बाजारभाव आणखी काही आठवडे कायम राहू शकतो, असा अंदाज पपई








बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

राज्यातील बाजारात कारल्याची आवक चांगली सुरु आहे. तर कारल्याला उठावही चांगला आहे. पण आवकेचा दबाव दरावर दिसून आला दर आपल्या उचांकी दरावरून ७०० रुपयांपर्यंत कमी झाले. मात्र दरपातळी एक महीन्यापासून टिकून आहेत. सध्या बाजारात कारली प्रतिक्विंटल २ हजार ५०० ते ३ हजार रुपयांच्या दरम्यान विकले जात आहेत. बाजारातील कारल्याची आवक पुढील काही आठवडे कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे दरही स्थिर राहू शकतात, असा अंदाज शेतकरी आणि व्यापारी व्यक्त करत आहेत.

आंतरराष्ट्रीय बाजारात सोयाबीनच्या दरात काहीसे चढ उतार सुरु आहेत. आज सोयाबीन आणि सोयापेंडच्या भावात शुक्रवारच्या तुलनेत काहीशी वाढ झाली होती. देशात मात्र सोयाबीनचा बाजार दबावातच आहे. सोयाबीनचा भाव बाजार समित्यांमध्ये प्रतिक्विंटल ३ हजार ७०० ते ४ हजार रुपयांच्या दरम्यान आज भाव मिळाला. तर सोयापेंडचा भाव सरासरी २७ हजार ते २८ हजार रुपयांच्या दरम्यान होते. बाजारातील सोयाबीनची आवक काहीशी कमी झाली आहे. मात्र सोयाबीनच्या भावावरील दबाव काही आठवडे कायम राहतील, असा अंदाज सोयाबीन बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला. देशातील बाजारात कापसाची आवक सरासरी एक लाख गाठींच्या दरम्यान कायम आहे. बाजारातील आवक चालू महिन्यात कमी होण्याची शक्यता आहे. तसेच आता शेतकऱ्यांकडील कापसाचा स्टॉकही कमी होत आहे. याचा परिणाम आवकेवर दिसेल. पण आंतरराष्ट्रीय बाजारातील कापसातील मंदी आणि देशातील स्थिर उठाव याचा परिणाम दरावर दिसत आहे. कापूस आज सरासरी ६ हजार ८०० ते ७ हजार २०० रुपयांच्या दरम्यान विकला गेला. पुढच्या काळात बाजारातील कमी आवकेबरोबर दरात काहीशी सुधारणा दिसू शकते, असा अंदाज कापूस बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

## मशरूम लागवडीची सुधारित पद्धत



अळिंबी (मशरूम) ही एक बुरशीजन्य हरितद्रव्यरहित वनस्पती असून, निसर्गामध्ये आळंबीच्या अनेक जाती आढळतात. आळंबीच्या अनेक जातींपैकी काही निवडक जाती खाण्यायोग्य आहेत. त्यामुळे व्यापारी तत्त्वार लागवड करण्यासाठी अशा खाण्यायोग्य जातीचाच उपयोग करता येतो. शिवाय त्याची लागवड सुधारित पद्धतीने केल्यास फायद्याचे ठरते.

आळंबीच्या जाती : युरोपीयन किंवा बटन मशरूम, आइस्टर किंवा धिंगरी मशरूम व भाताच्या काडावर वाढणारी अळिंबी या आपल्याकडे येणार्या आणि खाण्यायोग्य जाती आहेत. यापैकी सर्वच प्रकारच्या मशरूमची लागवड महाराष्ट्रात करता येते. यामध्ये धिंगरी अळिंबी आणि भाताच्या काडावर येणार्या आळंबीची लागवड व्यापारी तत्त्वावर करण्यात येते आणि विशेषत: त्यांचे बीजही सहज उपलब्ध होते.

धिंगरी अळिंबी : या मशरूमची लागवड अतिशय साध्या आणि सोप्या पद्धतीने करता येते. ऊन आणि पावसापासून निवार्याची जागा असली म्हणजे साध्या झोपडीतदेखील या अळिंबीची लागवड आपल्याला करता येते. शिवाय २० ते २५ दिवसात या आळंबीच्या उत्पानाची सुरवात होते. आणि फारसा खर्च देखील नसल्याने याची लागवड सर्वसामान्य शेतकर्यांना देखील करता येते.

लागवड : या आळंबीच्या लागवडीसाठी दीड ते दोन किलो भाताचे किंवा गव्हाचे काड घ्यावे. त्याचे तीन ते पाच सें.मी. लांबीचे तुकडे करावेत. ते तुकडे कापडी पिशवी किंवा पोत्यामध्ये भरून आठ ते दहा तास थंड पाण्यात भिजवून ठेवावे. त्यानंतर त्या काडातील पाणी चांगले निथळू द्यावे. नंतर तेच काड ८० ते ९० डिग्री सेल्सिअस तापमानाच्या पाण्यात २० मिटर बुडवावे. नंतर दोन ते तीन तास पाणी निथळण्यासाठी पाण्याच्या बाहेर काढून ठेवावे. जरूरीप्रमाणे प्लास्टिकची पिशवी घेऊन तिचा पातळ भाग लहान घड्या करून दोर्याने घट्ट बांधावा. ही पिशवी निर्जंतुक करण्यासाठी दोन टक्के फॉर्मेलीनमध्ये (जंतुनाशक) बुडवून घ्यावी. त्याचप्रमाणे आपल्याला अळिंबी ज्याखोलीत फॉर्मेलीनच्या द्रावणाने निर्जुंतुक करून घ्यावी. त्यानंतर पिशवी भरण्यासाठी शक्यतो बंदिस्त जागेचीच निवड करावी. पिशवीच्या तळासी डाळीचे पीठ व स्पॉन (आळंबीचे बीज) मिसळलेल्या काडाचे एकावर एक असे चार इंच जाडीचे चार ते पाच थर द्यावेत. पिशवीत काड भरत असतांना ते तळहाताने हलकेसे दाबावे. स्पॉनचे प्रमाण ओल्या काडाच्या वजनाच्या दोन टक्के म्हणजे २०० ग्रॅम स्पॉन १० किलो काडास व डाळीचे पीठ एक टक्के ठेवावे. उच्च दर्जाचे स्पॉन कोणत्याही मान्यवर संस्थेकडून घ्यावे.

पिशवी भरल्यानंतर तिचे तोंड घट्ट बांधावे. मशरूमच्या वाढीस साधारणपणे अनुकूल तापमान २० ते ३० डिग्री सेल्सिअस तापमान व हवेतील आर्द्रता ७० ते ८० टक्के लागते. अशा वातावरणात बुरशी वाढ १२ ते १५ दिवसात पूर्ण होते. त्यानंतर त्यापिशव्या लांबीच्या बाजूने ब्लेडने सरळ रेषेत कापून अलग कराव्यात. या बेडवर त्यापुढे दिवसातून एक ते दोन वेळा जरूरीप्रमाणे दररोज स्प्रेने पाणी फवारावे. लागवडीच्या जागेत ८० टक्के आर्द्रता कायम राहील याची काळजी घ्यावी. प्लास्टीकची पिशवी काढल्यापासून साधारणपणे तीन दिवसांत बेडच्या सर्व बाजूंनी मशरूमचे कोंब निघू लागतात. याच कोंबांची पुढे दोन ते तीन दिवसांत संपूर्ण वाढ होते व सर्व बाजूंनी बेडवर अळिंबी फळे दिसू लागतात. संपूर्ण वाढलेली धिंगरी मशरूम शिंपल्याच्या आकाराची पिवळसर पांढर्या अथवा करड्या रंगाची असते. तिचा देठ इतर आळंबीच्या मानाने कमी लांबीचा असतो. या मशरूमच्या वरील पृष्ठभाग मऊ व सपाट असतो तर पाठीमागील भागावर दाट शिरा असतात. पूर्ण वाढलेली धिंगरी अळिंबीही तळहाताएवढी मोठी असू शकते. मशरूम काढण्यापूर्वी चार ते सहा तास बेडवर पाणी शिंपडू नये. पूर्ण वाढ झालेला मशरूम कात्रीने देठ कापून काढणी करावी.

## ऊस पिकातील चाबूक काणी, गवताळ वाढ नियंत्रण

राज्यात उन्हाळी हंगामात ऊस पिकावर येणारा ताण ही नेहमीची बाब आहे. उन्हाळ्यात पाण्याचा ताण, वाढलेले तापमान, गरम हवा यामुळे पिकाच्या शारिरिक क्रिया मंदावतात. पानांतील हरितद्रव्ये कमी होऊन अन्न तयार होण्याचा व वहनाच्या मार्गात अडथळा निर्माण होतो. तमुळे पीक अशक्त होऊन त्याची रोगप्रतिकारक क्षमता कमी होते. पर्यायाने पीक अनेक रोगास बळी पडते. तसेच रोगाची तीव्रतादेखील वाढते. त्यासाठी योग्य काळजी घेणे आवश्यक आहे.

चाबूक काणी किंवा काजळी : सर्व ऊस उत्पादक भागात प्रादुर्भाव आढळतो. राज्यात लागवडीखाली असणाऱ्या सर्वच जाती या रोगास कमी-अधिक प्रमाणात बळी पडतात. पीक वाढीच्या सर्व अवस्थेत या रोगाचा प्रादुर्भाव आढळून येतो. लागण पिकापेक्षा खोडवा पिकात काणी रोगाचे प्रमाण जास्त आढळते. कारण लागण पिकातील रोगग्रस्त बेटे काढली जात नाहीत तसेच खोडवा पिकाचा सुरुवातीचा काळ उन्हाळ्यात राहतो. हवेतील व जमिनीचे तापमान वाढते. अशा पोषक हवामानात रोगाचा प्रसार व प्रादुर्भाव जास्त होतो. खानदेश आणि मराठवाडा भागात रोगाचा प्रादुर्भाव जास्त आढळून येत आहे.

रोगाचा प्रसार : मुख्यत्वेकरून दूषित बेण्यामार्फत तसेच वारा, पाऊस, पाणी, कीटक व जमिनीमार्फत होतो.



रोगाचे नियंत्रण : बेणे मळ्यातील बेणे लागणीसाठी निवडावे. मूलभूत बेणे तयार करण्यासाठी ऊस बेण्यास लागणीपूर्वी बाष्प उष्ण हवा प्रक्रिया सयंत्राद्वारे ५४ अंश सेल्सिअस तापमानास १५० मिनिटे प्रक्रिया करावी. त्यानंतर बेण्यास कार्बेन्डाझिम बुरशीनाशक (०.१ टक्के) १ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात प्रक्रिया करावी. मूलभूत बियाणे तयार करण्यासाठी उती संवर्धित रोपांचा पर्याय निवडावा. मध्यम रोगप्रतिकारक जाती (उदा. कोसी ६७१, को ८६०३२, व्हीएसआय ४३४, कोएम ०२६५, कोव्हीएसआय ०३१०२, पी. डी. न १५०१२, व्हीएसआय ८००५, कोव्हीएसआय १८१२१) ची लागवड करावी. नियमितपणे ऊस पिकाची पाहणी करून रोगग्रस्त बेटे मुळासहित काढावीत व जाळून नष्ट करावीत. काणीचे फोकारे बाहेर पडण्यापूर्वी बेटे निर्मुलन झाले, तर रोगाचा प्रसार कमी होण्यास मदत होते. याकरिता प्रथम काणीयुक्त फोकारे प्लास्टिकच्या पोत्यात किंवा पिशवीत काढून घ्यावीत व नंतर बेटे काढावीत. साखर कारखान्याच्या माध्यमातून सामुहिक पद्धतीने काणीग्रस्त बेटे निर्मूलनाचा कार्यक्रम हाती घेतल्यास रोगाचे नियंत्रण प्रभावी करता येईल.

लक्षणे : पिकाच्या सुरुवातीच्या काळात ऊस बेटात प्रमाणापेक्षा जास्त फुटवे दिसतात. बेटास गवताच्या ठोंबाचे स्वरूप येते. बेटांत फुटव्यांची संख्या काहीवेळा १०० पेक्षा जास्त आढळते. रोगामुळे उसाच्या पानामध्ये हरितद्रव्य कमी प्रमाणात तयार होते. त्यामुळे पाने पिवळी किंवा पांढरी पडतात. रोगट बेटात गाळण्यालायक ऊस तयार होत नाहीत. रोगट उसावरील पाने अरुंद व आखूड होतात. पूर्ण वाढ झालेल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास, पोंग्यातील पाने पिवळी पडतात. कांड्यावरील डोळ्यातून पिवळसर (केवड्यासारख्या) पांगशा फुटतात. रोगट ऊस नंतर पोकळ पडतो व वाळतो.




### महत्वाच्या घटना

१७९१ : रमॉंट हे अमेरिकेचे १४ वे राज्य बनले.
१८६१ : अब्राहम लिंकन अमेरिकेचे १६ वे अध्यक्ष झाले
१८३६ : शिकागो शहराची स्थापना झाली.
१८८२ : ब्रिटन मधील पहिली इलेक्ट्रिक ट्राम पूर्व लंडन मध्ये सुरु.
१९३६ : हिंडेनबर्गरचे पहिले उड्डाण झाले.
१९५१ : आशियायी सामन्यास प्रारंभ झाला.
१९६१ : भारतीय नौदलात १ ले विमानवाहू जहाज 'विक्रांत' दाखल झाले.
१९७४ : पिपल मॅगझिन चे पहिले प्रकाशन झाले.
१९८० : प्रचंड बहुमताने निवडणुका जिंकून रॉबर्ट मुगाबे हे झिम्बाब्वेचे पहिले कृष्णवर्णीय पंतप्रधान बनले.
१९८४ : महाराष्ट्रात वीजनिर्मितीचा नवा विक्रम याच दिवशी झाला.
१९९६ : चित्रकार रवी परांजपे यांना कॅग हॉल ऑफ फेम हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार जाहीर.
२००१ : पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते गुरुदासपूर येथील रणजितसागर धरण देशाला अर्पण केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६८ : चलत चित्रपटाचे प्रवर्तक हरीश्चंद सखाराम भाटवडेकर यांचा जन्म.
१८९३ : पायोनियर इन्स्ट्रुमेंट कंपनी चे सहसंस्थापक चार्ल्स हर्बर्ट कॉल्विन यांचा जन्म. (मृत्यू: ४ मार्च १९८५)
१९०६ : फिशर इलेक्ट्रॉनिक्स चे निर्माते एव्हेरी फिशर यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १९९४)
१९२२ : दीना पाठक, गुजराती व हिंदी अभिनेत्री.
१९२६ : ॲमवे चे सहसंस्थापक रिचर्ड डेवोस यांचा जन्म.
१९३५ : कॉँग्रेसच्या नेत्या प्रभा राव यांचा जन्म.
१९७३ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक चंद्र शेखर येलेती यांचा जन्म.
१९८० : भारतीय टेनिस खेळाडू रोहन बोपन्ना यांचा जन्म.
१९८६ : इंस्ताग्राम चे सहसंस्थापक माईक क्रीगेर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५२ : रशियन नाटककार आणि कथा कादंबरीकार निकोलय गोगोल यांचे निधन.
१९१५ : ब्रिटिश समर टाईम चे निर्माता विल्यम विल्लेत्त यांचे. (जन्म: १० ऑगस्ट १८५६)
१९२५ : रवीन्द्रनाथ टागोर यांचे मोठे भाऊ बंगाली साहित्यिक आणि चित्रकार ज्योतीन्द्रनाथ टागोर यांचे निधन. (जन्म: ४ मे १८४९ कोलकाता, पश्चिम बंगाल)
१९४८ : बाळकृष्ण शिवराम मुंजे - भारतीय मराठी राजकारणी, हिंदू महासभेचे संस्थापक.
१९५२ : नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटीश जैवरसायन शास्त्रज्ञ सर चार्ल्स शेरिंग्टन यांचे निधन. (जन्म: २७ नोव्हेंबर १८५७ आयलिंग्टन, लंडन, इंग्लंड)
१९७१ : कोकणचे गांधी आप्पासाहेब पटवर्धन
१९७६ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ वॉल्टर शॉटकी यांचे निधन. (जन्म: २३ जुलै १८८६)
११८१ : टोरिन थॅचर - भारतीय अभिनेता.
१९८५ : साहित्यिक डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे निधन.
१९९२ : सकाळ च्या प्रकाशिका आणि सकाळ पेपर्स प्रा. लि. च्या संचालिका शांताबाई परुळेकर यांचे निधन.
१९९५ : चरित्र अभिनेता इफ्तिखार (जन्म: २२ फेब्रुवारी १९२०)
१९९७ : अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ रॉबर्ट इह. डिक यांचे निधन.
१९९९ : भारतीय विमानोड्डाणाचा पाया घालणारे, एअर इंडियाचे पहिले कर्मचारी विठ्ठल गोविंद गाडगीळ यांचे निधन.
२००० : स्वातंत्र्य सेनानी, कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या, लोकसभा सदस्य गीता मुखर्जी (जन्म: ८ जानेवारी १९२४)
२००७ : सुनील कुमार महातो - भारतीय संसद सदस्य.
२०११ : केन्द्रीय मानव संसाधन मंत्री, ३ वेळा मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री आणि पंजाबचे राज्यपाल अर्जुनसिंग यांचे निधन. (जन्म: ५ नोव्हेंबर १९३०).

## कापूस पीक अवशेष व्यवस्थापनाचे तंत्र

सध्या कापूस पिकाची काढणी शेवटच्या टप्प्यात आहे किंवा पूर्ण झाली आहे. या कापूस पिकाच्या उर्वरित अवशेषाची (पऱ्हाटी) विल्हेवाट लावणे ही मोठी समस्या आहे. सध्या या अवशेषांवर केल्या जाणाऱ्या जाळण्यासारख्या प्रक्रियांमुळे पर्यावरणासाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळेच कापूस पिकाच्या अवशेषांचे व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने करण्यांच्या काही पद्धतींची माहिती घेतल्यास चांगला फायदा होईल.

कापूस पिकाच्या अवशेषांचे महत्त्व : कापूस पिकाचे अवशेष हे खनिज आणि सेंद्रिय पदार्थांचे एक समृद्ध स्रोत आहेत. यामध्ये नत्र, स्फुरद, पोटॅश, सेंद्रिय कर्ब आणि इतर अनेक पोषक तत्त्वे असतात. या अवशेषांचे योग्य व्यवस्थापन केल्यास चांगले फायदे होतात. कपाशीच्या अवशेषांमध्ये असलेले पोषक तत्त्वे मातीमध्ये मिसळल्याने मातीची सुपीकता वाढते. पिकांची वाढ चांगली होते. अवशेषांमुळे मातीची रचना सुधारून जलधारणक्षमता वाढते.अवशेषांमुळे मातीचे तापमान उन्हाळ्यात कमी आणि हिवाळ्यात जास्त राहण्यास मदत होते. अवशेषांमुळे तणांची वाढ कमी होते. अवशेषांमुळे मातीची धूप कमी होते. अवशेषांचा उपयोग सेंद्रिय खताच्या निर्मितीसाठी करता येतो.

कापूस अवशेष व्यवस्थापनातील समस्या : कापूस पिकाच्या अवशेषांमध्ये लिग्निनचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे त्यांचे विघटन होण्यास वेळ लागतो. शेतात पिकांचे अवशेष तिथेच जाळले जातात. त्यामुळे त्यातील महत्त्वाचे सेंद्रिय घटक जळून जातात. आजूबाजूंच्या अवशेषाला



आग लागण्याचा धोका असतो. पिकांच्या व्यवस्थापनासाठीच मुळात आर्थिक चणचण असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी पिकांच्या अवशेषांसाठी खर्च करण्याची अपेक्षा करणेही चुकीचे ठरते. बहुतांश शेतकरी या पिकांच्या वापर घरगुती जळणासाठी करतात.

अवशेषांचे शास्त्रीय व्यवस्थापन : कापूस पिकाच्या अवशेषांपासून सेंद्रिय खत, बायोगॅस, इंधन, बायोचार, पल्प, पिलेट्स, पेपर आणि पार्टिकल बोर्ड इ. बाबी बनविणे शक्य आहे. कापूस पीक अवशेष जमिनीत मिसळणे, यासाठी सामान्यपणे पुढील यंत्र किंवा अवजारांचा वापर केला जातो. अवशेषांचे बारीक तुकडे करून जमिनीत मिसळण्यासाठी उपयुक्त. अवशेष बारीक करून जमिनीत मिसळण्यासाठी उपयुक्त. अवशेष कापून व अंशतः गाडण्यासाठी वापरले जाते. कापसाच्या शेतात जनावरे चारण्यासाठी सोडल्यास कपाशीचे उरलेली बोंडे जनावरे खाऊन ते पूर्णपणे नष्ट करतील. बाकी राहिलेल्या अवशेषांचे मोबाईल श्रेडरने बारीक तुकडे केल्यास त्यातील गुलाबी बोंड अळीच्या विविध अवस्था नष्ट होतात. बोंड अळीचे जीवनचक्र खंडित होण्यास मदत होते.

सेंद्रियखत तयार करण्याची पद्धत : पऱ्हाटी ६० टक्के, शेण २५ टक्के, सूक्ष्मजीव समुदाय (मायक्रोबिअल कन्सोर्शियम) १ टक्का हे सर्व घटक एकजीव करून त्याचा ढीग करावा. हा ढीग त्याच अवस्थेत ३० दिवस ठेवावा. त्यानंतर पलटी मारून पुन्हा ३० दिवस ठेवावा. याप्रमाणे ६० ते ८० दिवसांत उत्तम प्रतीचे जैविक खत तयार होते. एक टन पऱ्हाटीपासून सुमारे ६०० ते ७०० किलो कंपोस्ट उपलब्ध होतो. उत्तम कुजलेल्या आणि समृद्ध पऱ्हाटी कंपोस्टमध्ये सामान्य कंपोस्टिंगच्या तुलनेत अन्नद्रव्य जास्त असते. त्याच्या वापरामुळे मातीचे आरोग्य चांगले होते. रासायनिक खतांचा वापर देखील कमी होतो.पर्यावरण संरक्षणासाठी शासकीय योजना : पऱ्हाटी व अन्य पीक अवशेषांच्या ज्वलनातून होणारे प्रदूषण ही मोठी समस्या ठरत आहे. त्यावर मात करण्यासाठी म्हणून अल्पभूधारक शेतकऱ्यांना पराटी व्यवस्थापनासाठी आवश्यक यंत्रे खरेदी करण्यासाठी कर्जाची उपलब्धता करणे आणि आवश्यक ते अनुदान देण्याची आवश्यकता आहे. दिल्लीमध्ये उच्च न्यायालयाच्या आदेशाने पंजाब व अन्य प्रांतामध्ये पिकांचे अवशेष जाळण्यावर बंदी घालण्यासाठी त्या सरकारांना त्या संदर्भात कठोर नियमावली करण्याचे आदेश पारीत केले आहेत. अवशेषातून तयार झालेल्या पर्यायी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे.

# बीड जिल्ह्याची बदनामी थांबवा ; बीडचं पुणे होऊ देणार नाही

## सामाजिक कार्यकर्त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हा हा गुणवंतांचा जिल्हा आहे. या जिल्ह्याने कलाक्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, क्षेत्रात सामाजिक क्षेत्रात ,प्रशासकीय पातळीवर तसेच न्यायिक क्षेत्रांमध्ये एवढेच नव्हे तर सर्व क्षेत्रांमध्ये यशस्वी गरुड झेप घेतलेली आहे .स्नेहभाव जपणारा जातीय सलोखा जोपासणाऱ्या या बीड जिल्ह्याला काही लोक बदनाम करत आहेत.बीड जिल्ह्याची बदनामी थांबवा या प्रमुख मागणीकडे लक्ष्य वेधण्यासाठी आणि, ''कोथरुडचं बीड होऊ देणार नाही'' पुण्यामध्ये बीडची बदनामी करणा-या लागलेल्या फलकाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.०३ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, पांडुरंग हराळे,शेख मुबीन, शेख मुस्ताक, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे सहभागी होते. जिल्हाधिकारी बीड




यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.

बीड जिल्हा हा गुणवंतांचा जिल्हा आहे. या जिल्ह्याने कलाक्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात सामाजिक क्षेत्रात, प्रशासकीय पातळीवर तसेच न्यायिक क्षेत्रांमध्ये एवढेच नाही सर्वच क्षेत्रांमध्ये यशस्वी गरुड झेप घेतली आहे.स्नेहभाव जपणाऱ्या जातीय सलोखा जोपासणाऱ्या या बीड जिल्ह्याला बाहेरच्या मीडियाने सर्वाधिक बदनाम केले आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांड अमानुष असून मानवतेला काळीमा फासणारे आहे.

या प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी बीडकरांची इच्छा आणि मागणी आहे. मात्र काही इलेक्ट्रॉनिक मीडियांनी बीड जिल्ह्यात येऊन जिल्ह्याच्या अस्मितेचे आणि एकात्मतेचे लचके तोडले आहेत.त्यामुळे बीड जिल्ह्याची प्रतिमा महाराष्ट्रात बिहार पेक्षा वाईट अशी जाणीवपूर्वक रंगवण्यात आली. एका घटनेने संपूर्ण बीड जिल्ह्यात वाईट ठेवण्याचा जो प्रकार सध्या सुरू आहे. तो थांबवणे गरजेचे आहे.

बीड जिल्ह्याची बदनामी थांबवण्याची जबाबदारी आम्हा सर्व बीडकरांची आहे. तसेच बिघडलेले वातावरण पुन्हा एकच चांगले करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याची गरज आहे या सामाजिक जाणिवेतून '' बीड जिल्ह्याची बदनामी थांबवावी या प्रमुख मागणीकडे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०३ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

पुण्यात बीड जिल्ह्याच्या विरोधात बॅनर लागावे ही घटना अत्यंत हास्यस्पद आहे. साऱ्या ब्रह्मांडाचे ज्ञान केवळ आपल्याच मस्तकात आहे. अशा अविर्भावात राहणाऱ्या पुणेकरांनी निदान दुसऱ्यांना नाव ठेवणे बंद करून स्वतःच्या जिल्ह्याचा, गावचा विचार करावा पुण्याच्या स्वयंघोषित तज्ञ व्यक्तीच्या मार्गदर्शनाची बीडकरांना गरज नाही.

पुण्यात दररोज केवळ महिलांवर नव्हे तर संपूर्ण मानवतेवर अत्याचार होताना पाहायला मिळतात. हेच पुणेकर कोथरूडचे बीड होऊ देणार नाहीत असे म्हणत पुणेकरांनी आता नाकाने कांदे सोडणे बंद करावे. विशेष म्हणजे ज्या स्वयंघोषित समाजसेवकांनी बीड जिल्ह्यात ठाण मांडून बीड किती भयानक आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला. त्यात स्वयंघोषित समाजसेवकांनी आता पुण्यामध्ये फिरून तेथील गल्लीबोळात दररोज काय होते हे महाराष्ट्र समोर आणावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यांनी केले आहे.

पुण्यामधील कोयता गँग अमली पदार्थांची तस्करी महिला वगैरे होणारे अत्याचार लोटमार मारामारी आणि पुण्याचा जर इतिहास जर पाहिला तर जोशी अभ्यंकर हत्याकांड, रंगा बिल्ला यांना पोसणारा ,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना शेण दगड मारणारा,महात्मा ज्योतिबा फुलेंवर मारेकरी घालणारा, दलितांच्या गळ्यात मडके आणि कमरेला खराटा बांधणारा ,महात्मा गांधींना मारणारा नथुराम यांना पोसणारा, पेशवाईत घटकंचुकी सारखे रंगेल अतिशय निर्लज्ज खेळ चाललेला आणि पुण्यात देशातील सर्वात जुनी आणि कुप्रसिद्ध अशी बुधवार पेठ आदीमुळे कुप्रसिद्ध असणाऱ्या पुणेकरांनी नाकाने कांदे सोलणे बंद करावे अशी संतप्त प्रतिज्ञा सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

# डिजिटल मिडिया परिषदेचे राज्यस्तरीय पदाधिकारी निवडणार–अनिल वाघमारे

## एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच बैठक

पुणे। प्रतिनिधी

डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या निवडी संदर्भात लवकरच एक व्यापक बैठक घेतली जाणार असुन या बैठकीसाठी राज्यभरातील डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य पदाधिकारी जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि यु ट्यूब चॅनल व पोर्टल चे संपादक,पत्रकार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात डिजिटल मिडिया परिषदेचे जाळे निर्माण करण्याचं काम हाती घेण्यात आले आहे. राज्यातील जवळपास २० जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यकारिणीच्या निवडी जाहीर केल्या गेल्या आहेत. उर्वरित जिल्ह्यांत सुध्दा या जिल्हा पदाधिकारी निवडी संदर्भात यंत्रणा उभी केली गेली आहे.



येत्या काही दिवसांत एक व्यापक बैठक घेतली जाणार असुन या बैठकीची तारीख, वेळ आणि ठिकाण लवकरच कळवले जाईल. मराठी पत्रकार परिषदेची डिजिटल मिडिया परिषद ही विंग मुख्य विश्वस्त श्री.एस.एम. देशमुख सर यांनी तयार केली असून आपण त्यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रभर काम करत असल्याचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी सांगितले. या डिजिटल मिडिया परिषदेची राज्यस्तरीय पदाधिकारी निवड प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही दिवसांत एक राज्यस्तरीय बैठक बोलावली जाणार आहे. आपणही यात सहभागी होण्यासाठी तसेच राज्य पदासाठी व जिल्हा पदासाठी इच्छुक असल्यास ९८२२५४८६९६ या वाटस अप नंबर वर आपला जिल्हा, आपली थोडक्यात माहिती व आपल्या माध्यमाची अर्थात यु ट्यूब किंवा पोर्टल ची लिंक पाठवावी. येत्या काही दिवसांत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे आणि राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही महत्वपूर्ण बैठक घेऊन डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या व जिल्हा पदाधिकारी यांच्या निवडी जाहीर केल्या जाणार आहेत. तरी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील यु ट्यूब चॅनल व पोर्टल चे संपादक आणि पत्रकार बांधवांनी या बैठकीसाठी उपस्थित रहावे असे आवाहनही प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

# जालन्यात मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील २०० स्टॉल दाखल

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामीण स्वयंसहाय्यता समुहा मार्फत उत्पादित वस्तुंचे छत्रपती संभाजीनगर विभागीय व जालना जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे दिनांक २८ फेब्रुवारी-२०२५ ते ०६ मार्च-२०२५ पासून सुरू आहे .कै. कल्याणराव घोगरे, क्रिडा संकुल उड्डाण पुला जवळ, स्टेशन रोड जालना यासंदर्भात जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शिरीष बनसोडे यांनी पत्रकार परिषद मध्ये माहिती देताना म्हणाले की हा जानकी महोत्सव जालन्यामध्ये ३५ लाख रुपये खर्च करून घेण्यात येत आहे. तसेच बाहेर जिल्ह्यामधून आलेले विक्रेते स्टॉल मध्ये घरगुती असलेले वस्तू तयार करण्यात आले आहे. त्या वस्तू घेण्याचे व पाहण्याचे लाभ जालना शहरातील व जिल्ह्यातील महिला व पुरुषांनी तसेच जिल्हा परिषद चे सर्व कर्मचाऱ्यांनी



घ्यावे. यावे पत्रकार परिषद मध्ये माहिती देताना ते म्हणाले की मी स्वतः व माझ्या कुटुंब सर्वांनी याचा लाभ घेतला. असे यावेळी बोलताना ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामीण स्वयंसहाय्यता समुहा मार्फत उत्पादित वस्तुंचे छत्रपती संभाजीनगर विभागीय व ''जानकी'' जालना जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन एकत्रीतरित्या दि. २८ फेब्रुवारी-२०२५ ते ०६ मार्च २०२५ या कालावधीत कै. कल्याणराव घोगरे, क्रिडा संकुल उड्डाण पुला जवळ, स्टेशन रोड जालना येथे आयोजीत करण्यात आलेले आहे. या विभागीय प्रदर्शनात मराठवाडयातील ८ जिल्हयातील एकुण २०० स्टॉल्स उभारण्यात आलेले आहे.

यामध्ये ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटातील महिलांनी उत्कृष्ट गावरान पध्दतीने तयार केलेले मसाले, हळद मिरची पावडर, पापड, खारुडी धपाटे पिठ, ढोकळा पिठ, विविध डाळी, बाटी पिठ, विविध फरसाण, गावरान तुप ॲपलजाम, मध, शोभवंत वस्तु घोगडी, योगा मॅट पत्रावळी लाकडी खेळणी असे विवीध प्रकारचे दर्जेदार उत्पादने विक्री करीता उपलब्ध आहेत तसेच यासोबतच ग्रामीण भागातील अस्सल चविष्ठ व चटकदार शाकाहारी व मांसाहारी जेवण, दहीधपाटे भरीत आकरी, झुनका भाकर, मिसळ, वडापाव, बंजारा पातळपोळी अशी मेजवाणी सर्वाकरीता उपलब्ध असणार आहे. दररोज संध्याकाळी ७.०० ते रात्री १०.०० पर्यंत सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या प्रदर्शनला आपण आपल्या परिवारासह अवश्य भेट देऊन ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटातील महिलांनी उत्पादीत उत्पादने व खादय संस्कृतीला प्रोत्साहन दयावे असे आवाहन मा. श्री शिरीष बनसोडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यानी केलेले आहे.

# तुलसी महाविद्यालयात ड्रेस डिझाईन प्रशिक्षण कार्यशाळा उदघाटन



बीड। प्रतिनिधी

तुलसी फॅशन ड्रेस डिझाईन महाविद्यालय, बीड येथे जिल्हा उद्योग केंद्र पुरस्कृत महाराष्ट्र उद्योजक्ता विकास केंद्र, बीड आयोजित विशेष घटक योजने अंतर्गत ड्रेस डिझाईनिंग प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदघाटन महाराष्ट्र उद्योजक्ता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर, प्राचार्य अशोक धुलधुले, प्रशिक्षक भागवत वैद्य, प्रोफेसर किशोर वाघमारे, राज मस्के, अंकिता जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी उद्योग कसा करावा यासंदर्भात अनेक उदाहरण देत एक संधी उपलब्ध करून दिली. नौकरी च्या अनेक संधी आहेत. त्यासोबत स्वतः चा उद्योग सुरु करू शकतो. असे आपल्या उदघाटन प्रसंगी प्राचार्य अशोक धूलधुले म्हणाले. दत्तात्रय क्षीरसागर आपल्या अध्यक्षनीय भाषणात म्हणाले की उद्योग, उद्योजक, आणि उद्योजक्ता विकास काय आहे. अशी माहिती देत प्रशिक्षण घेऊन नौकरी च्या तर संधी आहेत. पण आपण एक स्वतः चा उद्योग सुरु करावा. आज प्रत्येक जण फॅशनबल राहणीमान आवडते ह्या खूप संधी आहेत. आपण आपला ड्रेस डिझाईनिंग केला पाहिजे. या मध्ये आपल्या घरच्यांना सुद्धा सहभागी करून घेतले पाहिजे. यावेळी मोठ्या संख्येने विध्यार्थी उपास्तीत होते.या कार्यकर्माचे सूत्रसंचालन प्रोफेसर किशोर वाघमारे यानी केले तर आभार राज मस्के यांनी

# आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींच्या सन्मानासाठी किसान पुत्रांनी पुढे यावे –कालिदास आपेट

अंबाजोगाई

आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या पत्नींचा १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन कार्यक्रमात साडीचोळी देवून सन्मान करण्यात येणार असून शेतकरी पुत्रांनी या सन्मान सोहळ्यात एका शेतकरी बहिणीचा सन्मान करण्यासाठी स्वतः हुन पुढे यावे व या पवित्र कार्यात आपला खारीचा वाटा उचलावा असे आवाहन शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट यांनी केले आहे. या संदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात कालिदास आपेट यांनी पुढे असे म्हटले आहे की, आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या प्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने १९ मार्च हा दिवस शेतकरी सहवेदना दिवस म्हणून पाळला जातो. याच दिवशी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी अन्नत्याग आंदोलन करुन विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.



यावर्षी १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन निमित्ताने अंबाजोगाई येथे किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने सामुहिक उपवास, संवेदना रॅली, शेतकरी सहवेदना पुरस्कार वितरण, ''शेतकरी आत्महत्या; कारणं आणि मिमांसा'' या विषयावरील व्याख्यान आणि सामुहिक उपवास सोडण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. याच कार्यक्रमातील मुख्य सोहळ्यात अंबाजोगाई तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा साडीचोळी देवून सन्मान करण्यात येणार आहे. या सन्मानाच्या खर्चाचा भार सर्व शेतकरी पुत्रांनी उचलावा अशी संकल्पना असून प्रत्येक एका शेतकरी पुत्रांने एका बहिणींचा साडीचोळी देवून सन्मान करावा अशी अपेक्षा आहे. शेतकरी संघटनेतर्फे या सन्मान सोहळ्यासाठी पुढाकार घेतला असून शेतकरी पुत्रांकडून बहिणीच्या सन्मानासाठी इच्छुक असणाऱ्या शेतकरी पुत्रांना शोध घेण्यात येवून या सन्मानासाठी पुढे येणा-या शेतकरी पुत्राचे स्वागत करण्यात येत आहे. या कार्यक्रमात जास्तीत जास्त बहिणींचा सन्मान करण्याचे उद्दीष्ट असून शेतकरी पुत्राच्या आर्थिक योगदानातुनच हा उपक्रम यशस्वी होणार आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी व विधवा बहिणींचा साडीचोळी देवून सन्मान करण्यासाठी शेतकरी पुत्रांनी मोठ्या संख्येने पुढे यावे व १९ मार्च रोजी अंबाजोगाई येथे अन्नत्याग आंदोलन निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन कालिदास आपेट यांनी केले आहे.

# अन्नत्याग आंदोलनात किसानपुत्रांनी सहभाग घ्यावा-अमर हबीब



अंबाजोगाई

या वर्षीही शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहडत म्हणून किसानपुत्र आंदोलनच्या वतीने १९ मार्च रोजी करण्यात येणाऱ्या अन्नत्याग आंदोलनात किसानपुत्रांनी अधिकाधिक सहभागी व्हावे, असे आवाहन किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांनी केले. किसानपुत्र आंदोलनच्या वतीने अंबाजोगाई येथे १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलना निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत अमर हबीब बोलत होते. अमर हबीब पुढे म्हणाले की, देशातील ९० टक्के लोक शेतीवर अवलंबून असतांनापासुन शेतकरी आत्महत्या सुरु आहेत. तेंव्हापासून आजपर्यंत आर्थिक विवंचनेतून शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. आज शेतीवर अवलंबून असलेल्या शेतक-यांचे प्रमाण ९० टक्क्यांवरुन दहा ते पंधरा टक्क्यांवर आले आहे, मात्र शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण काही कमी झाले नाही, हे भीषण वास्तव चित्र आहे.

किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी मागील नऊ वर्षांपासून किसानपुत्र आंदोलन १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन राबवित आहे. अंबाजोगाई येथे हा उपक्रम गेली आठ वर्षांपासून अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु असून यावर्षी स्थानिक संयोजन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांत किसानपुत्रांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अमर हबीब यांनी केले.

बैठकीच्या प्रारंभी संयोजक सुदर्शन रापतवार यांनी १९ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये १९ मार्च रोजी सकाळी सामुहिक उपवास, सहवेदना रॅली, शेतकरी सहवेदना पुरस्कार, आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा साडीचोळी देऊन सन्मान, शेतकरी आत्महत्या कारणे आणि मिमांसा या विषयावरील व्याख्यान आणि सामुहिक उपवास सोडण्याचा कार्यक्रम यांच्या संपुर्ण नियोजनाची माहिती दिली. या कार्यक्रमात अंबाजोगाई तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील बहिणींचा सहभाग जास्तीत जास्त कसा करुन घेता येईल यासाठी ॲड. संतोष पवार यांनी माहिती दिली तर आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणीच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन संबंधीची माहिती शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट यांनी दिली. या बैठकीत अच्चुत बापु गंगणे, वसंतराव मोरे, अनिता कांबळे, अनिरुद्ध चौसाळकर, प्रा. शांती नाथ बनसोडे, मदन परदेशी, महावीर भगरे यांनी उपयुक्त सूचना केल्या. नगर परिषद परीसरातील पत्रकार कक्ष येथे आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस अमर हबीब, कालिदास आपेट, प्रा. शांतिनाथ बनसोडे, मुजीब काजी, अनिरुद्ध चौसाळकर, अच्यूत गंगणे, मदन परदेशी, संतोष बोबडे महावीर भगरे, व्यंकटेश जोशी, वसंत मोरे, इस्माईल शेख, लखन होके, कल्याणराव भगत, रेखा देशमुख, किरण देशमुख, अनिता कांबळे, प्रतिभा अवचर, दत्तात्रय अंबेकर, ॲड. माणिकराव बावणे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# ६ दिवसीय नि:शुल्क एक्युप्रेशर थॅरेपी आरोग्य शिबीर

## डॉ. पितानी विना औषध उपचार करणार – हस्तीमल बंब

जालना। प्रतिनिधी

भारतीय जैन संस्था, जालनाच्या विश्वस्त मंडळाची बैठक दि. १ मार्च २०२५ रोजी हस्तीमलजी बंब यांच्या अध्यक्षते खाली बंब यांच्या कार्यालयात घेण्यात आली. बैठकीचे प्रास्ताविक करताना श्री बंब म्हणाले येत्या ४ मार्च २०२५ मंगळवार पासून ९ मार्च २०२५ रविवार पर्यंत ६ दिवसीय एक्युप्रेशर, सुजोक व फिजियोथॅरेपी आरोग्य शिबीर जैन भवन, सकलेचा नगर, भोकरदन रोड, जालना येथे आयोजित करण्यात आले आहे.

या महत्वपुर्ण शिबीरात जोधपुर (राजस्थान) येथील डॉ. राममनोहर लोहिया आरोग्य जीवन संस्थेचे प्रख्यात थॅरेपिस्ट डॉ. महेन्द्र पितानी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी डॉ. सुरेन्द्र सिंह, डॉ. मनोहर पवार, डॉ. सुरेश पन्नु इ. तज्ञ डॉक्टरांची टीम विना औषधी आजारांवर उपचार करून सल्ला देतील. या शिबीरात




प्राकृतिक चिकित्सा पध्दतीत हात-पायाच्या तळ भागातील एक्युप्रेशर पाईंट व फिजीयोथॅरेपी द्वारे उपचार करण्यात येईल. आजच्या परिस्थितीत कोणता ही आजार झाला तर दवाखान्यात फार मोठा खर्च करावा लागतो, पण या प्राकृतिक उपचारा मुळे कोणत्या ही खर्च न करता ईलाज होऊ शकतो. यात डोके दुःखी, गुडघ्यांचे आजार, कंबर दर्द, डोळे, कान, नाक व गळ्याचे आजार, ऊँची वाढविणे, लठ्ठापणा, ब्लडप्रेशर, शुगर, गॅस, कब्ज व मानसिक तनाव, हात-पायात मुंग्या येणे इ. अनेक आजारांवर नोंदणी झालेल्या प्रत्येक व्यक्तिंवर विना औषध संपुर्ण ६ दिवसात दर रोज २० मिनीट उपचार करण्यात येईल. सर्व जाती-धर्माचे लोक यात नोंदणी करू शकतात. तरी गरजुं रुग्णांनी, सर्व बंधु-भगिणीनीं ४ मार्च पर्यंत नाममात्र नोंदणी फीस भरून नोंदणी करावी व सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आव्हान अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी केले आहे. उपाध्यक्ष नरेन्द्र मोदी, कोषाध्यक्ष विजय सुराणा, ताराचंद कुचेरिया, पार्श्वनाथ अंबेकर यांनी आपले विचार मांडले. या शिबीराच्या पुर्व तैयारीसाठी सुदेश सकलेचा, कचरुलाल नवलखा, विनोद बंब, सतिष बोथरा, राजेन्द्र सावजी, बसंतीलाल गोलेच्छा इ. परिश्रम घेत आहे. बैठकीत शिबीराची प्रचार सामुग्री वितरण करण्यात आली. सुत्र संचालन व आभार सचिव ॲड. अभय सेठिया यांनी मांडले.

# बीड जिल्ह्यातील ९९ हजार कुटुंबांना मिळणार घरकुल

## पंतप्रधान आवास योजनेतून ९३६ कोटींचे वाटप

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, मोदी आवास योजना अशा तिन्ही योजनेतून जिल्ह्यातील ९९ हजार कुटुंबांना घरकुल मंजूर करण्यात आले असून पंतप्रधान आवास योजनेतील ७८००० लाभार्थ्यांना प्रत्येकी,२०,००० रुपये त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. यातील रमाई व मोदी आवास योजनेतील जवळपास २१००० कुटुंबांना घरकुल मंजूर करण्यात आले असून मार्चपर्यंत त्यांना पहिला हप्ता मिळणार असल्याचे ग्रामीण विकास यंत्रणेचे जोशी यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांना विविध आवास योजनांच्या मंजुरी पूर्ततेसाठी शंभर दिवसाचा कार्यक्रम दिला होता. मात्र ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे आणि त्यांच्या सर्व टीमने हा कार्यक्रम अवघ्या ४५ दिवसात पूर्ण केला. त्यानंतर या हप्त्याचे वितरण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते पुण्यातून करण्यात आले.यातील बीड जिल्ह्यामध्ये ७८००० लाभार्थ्यांना प्रत्येकी १,२०,००० रुपये देण्यात आले. याशिवाय रमाई घरकुल योजनेतून मागासवर्गीय कुटुंबांसाठी ५००० घरांना मंजुरी देण्यात आली असून ओबीसी प्रवर्गातील मोदी आवास योजनेतून १६००० कुटुंबांना घरकुलासाठी मंजुरी देण्यात आली आहे. असे एकूण ९९००० कुटुंबांना घरकुल योजनेतून मंजुरी देण्यात आल्याची माहिती ग्रामीण विकास यंत्रणेचे जोशी यांनी दिली. यावेळी जोशी यांनी चार टप्प्यात या घरकुलांसाठी पैसे दिले जातात असे सांगितले. पहिल्या टप्प्यांमध्ये १५०००, दुसर्या टप्प्यात ३०००० , तिसऱ्या टप्प्यात ७० हजार आणि त्यानंतर उर्वरित पळ५००० रुपये दिले जाणार असल्याची माहिती जोशी यांनी दिली. याशिवाय शौचालय बांधकामासाठी स्वच्छ भारत मिशन मधून १२००० रुपये वेगळे दिले जाणार आहेत. तर सौर ऊर्जा योजनेतून सोलार साठी वेगळे अनुदान दिले जाणार आहे. तसेच नळ जोडणी साठी जलजीवन मिशन मधून त्यांना अनुदान मिळणार असल्याची माहिती बीड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक सौ संगीता देवी पाटील यांनी दिली.



### महाराष्ट्रात २० लाख घरे

महाराष्ट्र राज्यांमध्ये देशातील सर्वाधिक घरकुल मंजूर झाले असून एकट्या महाराष्ट्रामध्ये २० लाख घरांना मंजुरी दिली गेली. या सर्व घरकुल लाभार्थ्यांना पुणे येथील कार्यक्रमात देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने हप्त्याचे वाटप करण्यात आले.

### पंतप्रधान आवास योजनेतून ९३६ कोटींचे वाटप

पंतप्रधान आवास योजनेतून जिल्ह्यातील ७८ हजार कुटुंबांना प्रत्येकी एक लाख वीस हजार रुपये असे जवळपास ९३६ कोटी रुपये वाटप करण्यात आले असून आता घरकुलाच्या कामांना अधिक गती येईल अशी माहिती ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक सौ.संगीता देवी पाटील यांनी दिली.

### शौचालयासाठी मिळणार १२००० रुपये

जिल्ह्यातील पंतप्रधान आवास रमाई आवास मोदी आवास या तीनही योजनेसाठी स्वच्छ भारत मिशन मधून शौचालय बांधकामासाठी प्रत्येकी १२ हजार रुपये वेगळे मिळणार असल्याची माहिती स्वच्छ भारत मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र मोराळे यांनी दिली.

### सोलारसाठी मिळणार मदत

घरकुल पूर्ण झाल्यानंतर विजेचा प्रश्न सोडवण्यासाठी आणि कायमस्वरूपी मोफत वीज देण्यासाठी या घरकुल लाभार्थ्यांना सोलार योजनेचा मधून सोलार युनिट दिले जाणार असल्याची माहिती ही संबंधित यंत्रणेने दिली.




माजलगाव:- येथील बुध्दिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क, माजलगाव,जिल्हा बीडच्या वतीने बोधगया महाविहार मुक्ती साठी महामहिम राष्ट्रपती यांना माजलगाव तहसील मार्फत निवेदन देण्यात आले.

## शिवसेनेच्या आढावा बैठकीस शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे -जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायक राऊत, शिवसेना मराठवाडा संपर्क नेते सुनील प्रभु, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांचा दिनांक. ४/०३/२०२५ ते ६/०३/२०२५ रोजी बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी आढावा दौरा आयोजित करण्यात आला आहे तरी दिनांक ४ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव विधानसभा मतदारसंघातील तालुका धारूर, दुपारी १:३० वाजता तालुका वडवणी, दुपारी ३:३० वाजता तालुका माजलगाव व दिनांक ५/०३/२०२५ रोजी सकाळी आष्टी विधानसभा मतदारसंघातील तालुका आष्टी



येथे ११ वाजता, दुपारी १:३० वाजता तालुका पाटोदा, दुपारी ३:३० वाजता तालुका शिरुर येथे शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी, शिक्षक सेनेसह सर्व अंगीकृत संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित केली असून सदरील बैठकीस सहसंपर्कप्रमुख माजी मंत्री बदामराव पंडित, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील धांडे , सहसंपर्कप्रमुख लक्षराज सानप, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे उपस्थित राहणार आहेत


तरी शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी, शिक्षक सेनेसह सर्व अंगीकृत संघटनांच्या पदाधिकारी, महिला आघाडी जिल्हा संघटीका, युवा सेना जिल्हा युवा अधिकारी, उपजिल्हाप्रमुख, जिल्हा संघटक, जिल्हा समन्वयक, विधानसभा प्रमुख, तालुका प्रमुख, उपतालुकाप्रमुख,शहर प्रमुख,गटप्रमुख शाखाप्रमुख, बूथप्रमुख सह सर्व पदाधिकाऱ्यांनी बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केले आहे.

## रविवारी सामुदायिक उपनयन संस्कार

### माजलगावात जय्यत तयारी -डॉ. सचिन देशमुख यांची माहिती

माजलगाव । प्रतिनिधी

शहरामध्ये समस्त ब्राम्हण समाजाच्या वतीने दि ०९ मार्च २०२५ रविवार रोजी सामुदायिक उपनयन संस्कार चे आयोजन करण्यात आले असुन माउली लॉन्स येथे भव्य - दिव्य असा मंडपसह जय्यत तयारी करण्यात आली असल्याची माहिती उपनयन समितीचे अध्यक्ष डॉ.सचिन देशमुख यांनी दिली आहे.



मानवांच्या ऐहिक व पारलौकिक उत्कर्षासाठी केवळ आणि केवळ वेद माउली समर्थ आहे. विवेक, सदाचार, ज्ञान आणि विज्ञानाची प्राप्ती, वेदाध्ययन व वेदप्रतिपादित कर्मांतूनच होते, आणि वेदाध्ययनाचा हा मौलिक अधिकारी बटूंना उपनयन संस्काराव्दारे प्राप्त होणार आहे. माजलगाव येथील समस्त ब्राम्हण समाजाच्या वतीने सामुदायिक उपनयन संस्कार चे आयोजन दि ०९ मार्च रविवारी सकाळी ११:१२ वाजता करण्यात आले आहे.यावेळी रामचंद्र गोपालकृष्ण मठाचे मठाधिपती श्री श्री श्री योगानंद सरस्वती स्वामीजी यांची उपस्थिती असणार आहे.या कार्यक्रमाची माउली लॉन्स येथे जय्यत तयारी करण्यात आली असुन कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन सासमुदायिक उपनयन समितीच्या वतीने समितीचे अध्यक्ष डॉ.सचिन देशमुख, बप्पा देशमुख, विनायक रत्नपारखी, आनंतशास्त्री जोशी, नंदु आनंदगांवकर, दामोधर संधीकर, दत्ता महाजन,मुकुंद जोशी, गणेश मुळे,कृष्णा कान्नापुरकर यांचेसह समस्त ब्राम्हण समाज माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.

## वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष यांची शेतकरी कुटूंबास भेट

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालूक्यातील वडीगोद्री येथील नैराश्यग्रस्त शेतकरी पृथ्वीराज बबन काळे (वय ४३) यांनी ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी आत्महत्या केली होती. या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबियांची वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अ‍ॅड निलेश हेलोंडे पाटील यांनी आज सांत्वनपर भेट घेतली. या पीडित परिवाराच्या समस्या जाणून घेत त्यांना शासनाच्या वतीने देण्यात येणारी सर्व मदत करण्याची ग्वाही दिली.

शेतकऱ्यांनी आलेल्या परिस्थितीसमोर हार न मानता आपल्या एका चुकीच्या निर्णयामुळे परिवाराची होणारी आबाळ लक्षात घेऊन परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी खंबीर उभे राहण्याची गरज आहे. शासन व प्रशासन शेतकरी बांधवाच्या पाठीशी सदैव ठाम असल्याचे अ‍ॅड निलेश हेलोंडे पाटील यांनी सांगितले. यावेळी तहसीलदार कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांच्यासह काळे परिवारातील सदस्य व गावकरी उपस्थित होते.

## पाटोदा डिजिटल मीडिया परिषदेच्या तालुकाध्यक्षपदी गोकुळ इंगोले

पाटोदा । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी पाटोदा तालुकाध्यक्षपदी गोकुळ इंगोले, कार्याध्यक्ष हरिदास शेलार तर सचिवपदी नितीन भोंडवे यांची निवड जाहीर केली आहे.

प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाल्याने, या पुढील काळात प्रत्येक घटना आणि माहिती तात्काळ वाचक आणि प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि त्यासोबतच डिजिटल मीडियामध्ये



काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकारांच्या हितासाठी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी डिजिटल मीडिया परिषद स्थापन केली आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी दिनांक ३ मार्च २०२५ रोजी डिजिटल मीडियाची बीड तालुका कार्यकारणी पुढील दोन वर्षासाठी जाहीर केली आहे. यात तालुकाध्यक्षपदी- गोकुळ इंगोले, कार्याध्यक्ष- हरिदास शेलार, उपाध्यक्ष- प्रदीप उबाळे, सचिव- नितीन भोंडवे तर संघटकपदी- बलभीम सावंत यांचा समावेश आहे.बीड तालुक्यात



माजलगाव ;- येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे लेखापाल उद्धव फपाळ साहेब यांचा येवले ज्वेलर्स मध्ये वाढदिवसानिमित्त सत्कार करताना पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम बापू येवले, ह. भ. प. गिण्यानदेव नाना गावडे, मनसे तालुकाप्रमुख धोंडीराम जाधव सिद्धेश्वर येवले, दत्ता येवले, महेश येवले, दिगंबर सपकाळ.

## महाराष्ट्र पोलीस बॉय संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी शुभम वाघमारे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नागरिकांच्या व सामाजिक चवळीमध्ये शुभम वाघमारे यांचा मोलाचे योगदान व कार्य असल्याने आज त्यांची महाराष्ट्र पोलीस व संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली शुभम भैया वाघमारे यांची महाराष्ट्र पोलिस बॉईज संघटना बीड जिल्हा अध्यक्षपदी (लीगल सेल) निवड महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना बीड जिल्हा अध्यक्षपदी (लीगल सेल) अ‍ॅड.शुभम गौतमराव वाघमारे यांची निवड करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल भैया दुबाले व पदाधिकारी योगेश कदम, दत्ता गवते,आदर्श जाधव, प्रशांत जगताप यांनी त्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचे महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या कुटुंबात सहर्ष स्वागत केले. महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल भैया दुबाले यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. शुभम भैय्या वाघमारे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे स्वागत करण्यात येत आहे व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## आरटीई अंतर्गत मिळणाऱ्या गोरगरिबांच्या प्रवेशावर डल्ला मारण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर

### खोटी कागदपत्रे सादर करून तीन शाळात पालकांनी मिळवले प्रवेश

### मनोज जाधव यांची जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार



बीड । प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत आर्थिक दुर्बल, वंचित, गोरगरीब विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश मिळावा या हेतूने शासन आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवते मात्र या प्रवेश प्रक्रियेत खरे लाभार्थी विद्यार्थी वंचित राहत असून खोट्या कागद पत्रांच्या आधारे धनदांडगेच गोरगरिबांच्या प्रवेशावर डल्ला मारण्याचे काम करत आहेत. यात शहरातील पोदार इंग्लिश स्कूल, गुरुकुल इंग्लिश स्कूल आणि संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल या तीन शाळेत प्रवेश मिळवा यासाठी पालकांनी अपडेट केलेले आधार कार्ड, खोटी भाडेपत्र आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडली आहेत. या सर्व प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची कागदपत्रे तपासून त्यांचे प्रवेश रद्द करण्यात यावेत अशी मागणी आरटीई कार्यकर्ते तथा शिवसंग्राम चे युवा नेते मनोज जाधव यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे.

बीड शहरातील पोदार इंग्लिश स्कूल, गुरुकुल इंग्लिश स्कूल आणि संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल शाळेत आरटीई प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनि खोटे कागदपत्र जसेकी आधार, भाडेपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र दाखल करून प्रवेश मिळवले आहेत.तेव्हा तालुका स्तरीय निवड समितीने महिनाभराच्या कालावधीत अपडेट केलेले आधार तपासावेत ज्या पत्त्याचा आधार असेल त्यांचे आणखी एक रहिवासी पुरावा घ्यावा, भाडेपत्र सदर केलेल्या पालकांच्या सदर केलेल्या भाडेपत्र ठिकाणी पालक राहतात का यासाठी त्यांच्या घरी भेट द्यावी आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र हे अर्ज दाखल करण्या पूर्वीचे घ्यावे जेणे करून आरटीई बोगस प्रवेशला आळा बसलेल आणि खऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतील असे निवेदनात मनोज जाधव यांनी म्हटले आहे.

### आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी मुदतवाढ

आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी मुदतवाढ

जिल्ह्यातील २१४ खासगी शाळांत २ हजार २३५ जागा आरटीई प्रवेशासाठी उपलब्ध होत्या या जागा करिता ५ हजार ७८१ इतके अर्ज प्राप्त झाले होते. यातून आता २ हजार १८३ विद्यार्थ्यांची मोफत प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात आली होती मात्र आता ही मुदत १० मार्च पर्यंत वाढवण्यात आली आहे. आतापर्यंत जिल्ह्यात १ हजार २४६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.

## ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांचे सरपंच परिषदेकडून सांत्वन



आष्टी । प्रतिनिधी

राज्याचे ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांचे वडील समता शिक्षण संस्थेचे संचालक, माण तालुका रेशनिंग दुकानदार संघटनेचे अध्यक्ष तथा बोराटवाडी सेवा सहकारी संस्थेचे,चेअरमन स्व.भगवानराव रामचंद्र गोरे (दादा) यांचे निधन झाले. मंत्री महोदयांची सरपंच परिषदेचे सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, प्रदेश कोषाध्यक्ष आनंदराव जाधव, पश्चिम महाराष्ट्र सचिव संजय शेलार, कोर कमिटी अध्यक्ष आबासाहेब सोनवणे,कोअर कमिटी उपाध्यक्ष जे. डी.टेमगिरे,सातारा जिल्हा महिला अध्यक्षा मेघाताई नलवडे,सातारा जिल्हा परिषद सभापती वनितताई गोरे,सातारा जिल्हा सचिव शत्रुघन धनवडे,सातारा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख एनटीडी उर्फ नंदकुमार तुळशीराम डोईफोडे,कोरेगाव तालुका उपाध्यक्ष गोविंद कदम,खटाव तालुकाध्यक्ष लालासाहेब माने, सातारा तालुकाध्यक्ष मेघा माने, सातारा तालुका सचिव हनुमंत देवरे,सातारा तालुका उपाध्यक्ष राहुल डांगे जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांचेसह राज्य कार्यकारिणी पदाधिकारी यांनी त्यांच्या बोराटवाडी (दहिवडी) येथील निवासस्थानी भेट घेत मंत्री ना. जयकुमार

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पोलिसाचा खून करून फरार झालेल्या आरोपीला बेड्या; दोन विवाह केल्याचेही उघडकीस

**पुणे । प्रतिनिधी**

कानून के हात लंबे होते है, चा अनुभव पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला. फक्त महाराष्ट्र नाही तर कर्नाटक पोलिसांनी देखील तो अनुभवला असून, पुणे पोलिसांनी सलग ११ वर्ष कर्नाटक पोलिसांना गुंगारा देणाऱ्या एका आरोपीला अटक केली आहे. तो कर्नाटकात पोलिसाचा खून करून पसार झाला होता. तेव्हापासून तो पुण्यात वास्तव्य करत असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, फरार काळात त्याने दोन विवाह केल्याचे तपासात उघडकीस आले आहे.




अमरीश काशिनाथ कोळी (वय ४५, रा. कलबुर्गी, कर्नाटक, सध्या रा. गंगानगर, फुरसुंगी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली फुरसुंगी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक मंगल मोढवे, गुन्हे शाखेचे निरीक्षक राजेश खांडे, हवालदार महेश उबाळे, सुनील कांबळे, वैभव भोसले यांनी ही कामगिरी केली. कोळी याने तीन विवाह केले आहेत. त्याच्या दोन पत्नी सोलापूरमध्ये राहायला आहेत. कर्नाटकातील गुलबर्गा परिसरात त्याची एक पत्नी राहायला आहे. कर्नाटकात पोलीस कर्मचाऱ्याचा खून केल्याप्रकरणी त्याला अटक केली होती. कारागृहातून त्याला उपचारासाठी विजापूर येथील रुग्णालयात पाठविण्यात आले होते. रुग्णालयातून तो पसार झाला होता. त्याला न्यायालयाने फरारी घोषित केले होते. फरारी झाल्यानंतर त्याने दोन विवाह केले.

फुरसुंगीतील गंगानगर भागात कोळी वास्तव्यास होता. कर्नाटकातील पोलीस कर्मचाऱ्याच्या खून प्रकरणात कोळी गेले अकरा वर्षे फरारी असल्याची माहिती फुरसुंगी पोलिसांना मिळाली. त्यानंतर त्याचे छायाचित्र किंवा निश्चित माहिती पोलिसांना मिळाली नव्हती. फुरसुंगी पोलिसांनी कर्नाटकातील गुलबर्गा पोलिसांकडून माहिती मिळवली. २००९ मध्ये त्याने पोलीस कर्मचाऱ्याचा खून केला होता. या गुन्ह्यात न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. कारागृहात शिक्षा भोगत असताना त्याने आजारी पडल्याचा बहाणा केला. त्याला विजापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. १४ ऑगस्ट २०१४ रोजी तो रुग्णालयातून पसार झाला. याप्रकरणी विजापूर येथील गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोळी पसार झाल्यानंतर रुग्णालयात बंदोबस्तास असलेल्या चार पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले. तो गेले ११ वर्षे सोलापूर आणि पुण्यात वेगळ्या नावाने वास्तव्य करत होता. कोळी फुरसुंगी परिसरात राहुल कांबळे आणि राजू काळे या बनावट नावांचा वापर करून वास्तव्य करत असल्याची माहिती फुरसुंगी पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी सुनील कांबळे आणि वैभव भोसले यांना मिळाली. फुरसुंगी पोलिसांनी कर्नाटक पोलिसांशी संपर्क साधून आरोपी कोळी याची माहिती आणि छायाचित्र मिळवले. त्याची माहिती कर्नाटक पोलिसांना देण्यात आली. गुलबर्गा पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी भीमा नायक आणि शशीकुमार हुगार हे बुधवारी पुण्यात आले. पोलिसांनी सापळा लावून त्याला पकडले. कोळी याचा पहिला विवाह गुलबर्गा येथे झाला. त्यानंतर सोलापूर येथे त्याने दोन विवाह केले. सोलापुरातच त्याच्या दोन पत्नी वेगवेगळ्या ठिकाणी राहतात. त्याने बनावट आधार कार्ड आणि पॅन कार्ड काढले होते. रिक्षाचालक म्हणून काम करून, तसेच मजुरी करून तो उदरनिर्वाह करीत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

# पुणे महापालिकेचा अतिक्रमणांवर कारवाईचा बडगा; 'या' घटनेमुळे प्रशासनाला जाग

पुणे । प्रतिनिधी

पुणे: स्वारगेट स्थानकात झालेल्या बलात्काराच्या घटनेच्या पार्श्वभुमीवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने या परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई केली. पुणे महापालिकेने अतिक्रमण विभागामार्फत दिलेले परवाने व फेरीवाला प्रमाणपत्रामधील अटी शर्तीचा भंग करणारे व्यावसायिक यामध्ये स्वतः व्यवसाय न करणे, पोटभाडेकरू ठेवणे, मान्य जागेवर व्यवसाय न करणे, मान्य व्यवसाय न करणे, सिलेंडरचा वापर करणे आदी प्रकारे अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली.



कारवाईसाठी क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक, अतिक्रमण निरीक्षक, सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक, जेसीबी, बिगारी सेवक, पोलीस कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्मचारी तसेच स्थानिक पोलीस कर्मचारी यांचे समवेत कारवाई सुरळीतपणे पार पडली. अतिक्रमण विभागाचे उप आयुक्त संदीप खलाटे, महापालिका सहाय्यक आयुक्त प्रदीप आव्हाड, बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या नियंत्रणाखाली पुणे शहर पोलिस अंतर्गत स्वारगेट पोलीस स्टेशन यांचे समवेत अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्यात आली. स्वारगेट स्थानकावर बलात्काराची घटना घडल्याने वातावरण चांगलेच तापले आहे. या परिसरात एसटी प्रशासनाकडून तसेच पोलिसांकडून लक्ष दिले जात नाही. अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यात राजकीय पक्षांकडून तसेच सामाजिक संस्थांकडून आंदोलन देखिल करण्यात आली आहेत. त्याची दखल घेत महापालिकेने स्वारगेट स्थानकावर अतिक्रमण कारवाई केली. असे अतिक्रमण विभागाने सांगितले.

# चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून तिघांची फसवणूक; तब्बल ५५ लाखांना घातला गंडा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात फसवणुकीचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून फसवणुकीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता एक मोठी बातमी समोर आली आहे. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवत तिघांची ५५ लाखांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी वारजे माळवाडीत एक आणि वाघोली पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल झाले आहेत.

वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात एका ४२ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. त्या व्यक्तीची ३२ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक झाली. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार कर्वेनगर परिसरात राहतात. ते नोकरी करतात. त्यांना नोव्हेंबर २०२४ मध्ये अनोळखी व्यक्तीने मोबाइलवर शेअर बाजारातील गुंतवणुकीची माहिती देणारा मेसेज टाकला. त्यांनी मॅसेज पाहून त्यातील लिंक ओपन केली. तेव्हा सायबर चोरट्यांनी त्यांच्याशी चॅट करत गुंतवणुकीचे आमिष दाखवले. चांगली रक्कम मिळेल असेही सांगितले. तक्रारदारांनी काही रक्कम गुंतवली. त्यावर सायबर चोरट्यांनी परतावा देऊन त्यांचा विश्वास संपादित केला. नंतर तक्रारदाराला अधिकाधिक रक्कम गुंतवण्यास सांगितले. तक्रारदाराने ३२ लाख ९० हजार रुपये गुंतवणूक केली. त्यानंतर सायबर चोरट्यांनी तक्रारदाराकडे अधिक पैशांची मागणी केली. तसेच, परतावा देणेही बंद केले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. अशाचं पद्धतीने वाघोली



परिसरात देखील दोन व्यक्तींना गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी वाघोली पोलिसांत दोन स्वतंत्र गुन्हे नोंदवले आहेत. त्यात ३६ वर्षीय नोकरदाराची १२ लाख ८४ हजार रुपयांची आणि अन्य एकाची नऊ लाख ८६ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. दोघांना देखील शेअर बाजारात गुंतवणूक करायला सांगून परतावा आणि मुद्दल परत केली नाही.

# दुचाकी वाहने चोरणाऱ्यांना ठोकल्या बेड्या; तब्बल १४ दुचाकीसह एक सायकल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**


राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता एक मोठी बातमी समोर आली आहे. पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातून दुचाकी चोरणाऱ्या चोरट्यांना पोलिसांनी अटक केली आहे. फरासखाना पोलीस, तसेच गुन्हे शाखेच्या दरोडा आणि वाहन चोरी प्रतिबंधक पथकाने ही कारवाई केली आहे. पोलिसांनी चोरट्यांकडून १४ दुचाकीसह एक सायकल जप्त केली आहे.



पुणे शहराच्या मध्यभागातून दुचाकी चोरणारा आकाश हेरु कुंचन (वय २६, रा. बाटा गल्ली, बुधवार पेठ) याला अटक करण्यात अली आहे. आरोपी आकाशने फरासखाना पोलीस ठाणे, तसेच ग्रामीण परिसरातून दुचाकी चोरल्याचे तपासात उघडकीस आले आहे. वाहन चोरीचे गुन्हे रोखण्यासाठी फरासखाना पोलिसांकडून गस्त घालण्यात येत होती. आकाशने दुचाकी चोरीचे गुन्हे केले असून, तो बुधवार पेठेतील ढमढेरे गल्लीत थांबल्याची माहिती पोलीस कर्मचारी वैभव स्वामी, प्रवीण पासलकर, महेश राठोड यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. चौकशीत त्याने दुचाकी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून चार दुचाकी आणि एक सायकल जप्त करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अजित जाधव, सहायक निरीक्षक वैभव गायकवाड, उपनिरीक्षक अरविंद शिंदे, मेहबुब मोकाशी, तानाजी नागरे, नितीन तेलंगे, प्रवीण पासलकर, वैभव स्वामी, विशाल शिंदे, महेश राठोड, नितीन जाधव, गजानन सोनुने यांनी ही कामगिरी केली. गुन्हे शाखेच्या दरोडा आणि वाहन चोरी विरोधी पथकाने शहराच्या वेगवेगळ्या भागातून दुचाकी चोरणाऱ्या आणखी दोन चोरट्यांना अटक केली. त्यांच्याकडून दहा दुचाकी जप्त करण्या आल्या. रियाज उर्फ डाड्या शार्दुल शेख (वय २१, रा. आमराई, कोकाटे चाळीजवळ, पाषाण), अनिल लिंगय्या भंडारी (वय ३४, रा. सुतारवाडी, पाषाण) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यंची नावे आहेत. शेख आणि भंडारी यांनी शहराच्या वेगवेगळ्या भागातून दुचाकी चोरल्याची माहिती पथकाला पोलिसांनी शेख आणि भंडारी यांना पकडले. त्यांच्याकडून दहा दुचाकी जप्त करण्यात आल्या. जप्त करण्यात आलेल्या दुचाकींची किंमत पाच लाख ६० हजार रुपये आहे. आरोपींनी मुंढवा, हडपसर, बाणेर, कोथरूड, पिंपरी-चिंचवडमधील सांगवी, शिरगाव परंदवाडी, तसेच पुणे ग्रामीण पोलीस दलातील राजगड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोरल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार बिडवाई, सहायक निरीक्षक प्रवीण काळुखे, अमित गद्रे, बाळू गायकवाड, अजित शिंदे, मनीषा पुकाळे, प्रदीप राठोड, गणेश ढगे यांनी ही कारवाई केली.

# ॲट्रॉसिटी व मारहाणीच्या गुन्हयातून आरोपींची निर्दोष मुक्तता

शिरूर : शिरूर तालुक्यातील केंदूर या गावातील एका इसमास जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी आरोपी आलीदर प-हाड, बाळू प-हाड, नवनाथ पहाड व दत्तात्रय प-हाड यांची पुणे येथील विशेष न्यायाधिश संजीवकुमार नरवाडे यांनी गुणदोषावर चौकशी करून निर्दोष मुक्तता केली आहे.




याबाबत सविस्तर माहीती अशी की, तक्रारदाराने माझे शेतजमीनीवर गुरे का चारता असे विचारल्याचे कारणावरून आरोपींनी तक्रारदारास व त्याचे पत्नीस जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केलेबाबत आरोपीविरूध्द शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अनुसूचित जाती आणि अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम तसेच भारतीय दंड संहितेनुसार तकार नोंदविलेली होती.

सदर तक्रारीनुसार पुणे येथील विशेष न्यायालयामध्ये दाखल असलेल्या खटल्यामध्ये सरकारी पक्षातर्फे एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये स्वतः तक्रारदार, त्याची पत्नी, पंच, वैद्यकिय अधिकारी तसेच तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविण्यात आली. आरोपींनीही त्यांचे बचावासाठी साक्षीदार तपासले होते.

आरोपींनी तक्रारदार याने जमीनीचे तसेच पाण्याचे पाईपलाईनचे वादातून खोटी तक्रार दाखल केलेबाबतचा बचाव मे.न्यायालयासमोर मांडलेला होता व त्याबाबत पुरावे सादर केलेले होते. आरोपीतर्फे वकीलांनी तपासादरम्यान झालेल्या त्रुटी तसेच साक्षीदारांचे उलटतपासामध्ये झालेली तफावत प्रभावीपणे मांडलेल्या होत्या.आरोपीतर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ग्राहय धरून तसेच सबळ पुराव्याअभावी मा. विशेष न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता केलेली आहे. आरोपीतर्फे सदर खटल्याचे कामकाज ॲड. जयसिंग पडवळ, ॲड. उदय सरोदे, ॲड. अभिषेक बाफणा, ॲड. स्वप्नील कापरे यांनी पाहीले.

# पुनित बालन ग्रुप तर्फे आयोजित 'फ्रेंडशिप करंडक' २०२५ क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेचे चौथे पर्व ४ मार्चपासून

पुणे - पुनित बालन ग्रुप तर्फे पुण्यातील गणपती मंडळ, नवरात्र मंडळ, ढोल-ताशा पथकांच्या संघांचा समावेश असलेल्या चौथे पर्व 'फ्रेंडशिप करंडक' क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि. ४ ते ९ मार्च २०२५ या कालावधीत होणार असून स्पर्धेत विविध मंडळांचे २४ संघ सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना पुनित बालन ग्रुपचे संचालक पुनित बालन यांनी सांगितले की, सार्वजनिक गणपती, नवरात्र मंडळे तसेच ढोल-ताशा पथकांचा समावेश असलेली ही नाविन्यपूर्ण क्रिकेट स्पर्धा ठरली आहे. स्पर्धेला माणिकचंद ऑक्सिरीच यांचे प्रायोजकत्व लाभले आहे. स्पर्धेचे हे सलग चौथे पर्व आहे. गणपती मंडळ, नवरात्र मंडळ, ढोल-ताशा पथकांचे २४ निमंत्रित संघ एकत्रितपणे या क्रिकेट स्पर्धेत भाग घेतात आणि हेच या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. या वर्षी स्पर्धेमध्ये आठ नवीन संघांना खेळण्याची संधी देण्यात आली असून स्पर्धेमध्ये विजेतेपदासाठी अधिक चुरस दिसणार आहे.

ढोल-ताशा पथकांच्या २४ संघांचा समावेश

पुण्यातील श्री कसबा गणपती मडळ, श्री तांबडी जोगेश्वरी मंडळ, गुरुजी तालिम मंडळ, श्री तुळशीबाग गणपती मंडळ या मानाच्या गणपती मंडळांसह श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट, अखिल मंडई मंडळ, श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती मंडळ, होनाजी तरुण मंडळ, जनार्दन पवळे संघ, साई गणेश मंडळ विश्रामबाग मित्र मंडळ हे सहभागी होणार असून महालक्ष्मी मंदिर ट्रस्ट, सूर्योदय प्रतिष्ठान या नवरात्र मंडळांसोबत युवा वाद्य ,श्रीराम, शिवमुद्रा, नादब्रह्म सर्ववादक,समर्थ, रमणबाग, नादब्रह्म ट्रस्ट, गजर,नुमवी, शिवतेज आदी वादक पथकांच्या क्रिकेट संघांचा स्पर्धेत समावेश आहे.

या स्पर्धेचे सामने सहकारनगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूल येथील मैदानावर होणार आहेत. साखळी आणि बाद फेरीमध्ये होणार्या स्पर्धेत २४ संघांपैकी अव्वल ८ संघ बाद फेरीमध्ये प्रवेश करणार आहेत.रंगारी रॉयल्स्, दगडुशेठ वॉरीयर्स, गुरुजी तालिम टायटन्स्, मंडई मास्टर्स, साई पॉवर हिटर्स, जोगेश्वरी जॅग्वॉर्स, कसबा सुपरकिंग्ज्, गरूड स्ट्रायकर्स, तुळशीबाग टस्कर्स, महालक्ष्मी मॅव्हरीक्स्, शिवमुद्रा ब्लास्टर्स, नादब्रम्ह ड्रमर्स, श्रीराम पथक, नादब्रह्म सर्ववादक, युवा योद्धाज्, सुर्योदय राईझर्स, जनार्दन जायंट्स, नुमवी स्टॅलियन्स्, भगतसिंग लिजंड्स, विश्रामबाग नाईट्स, समर्थ चॅलेंजर्स, एच.टी.एम. टायगर्स, गजर सुपरनोव्हाज्, रमणबाग फायटर्स असे २४ निमंत्रित संघ स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

विजेत्या संघाला २ लाख ११ हजार रूपये व करंडक तर, उपविजेत्या संघाला १ लाख ११ हजार रूपये आणि करंडक मिळणार आहे. या शिवाय स्पर्धेत वैयक्तिक पारितोषिकेही देण्यात येणार आहेत. मालिकेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू याला ५१ हजार रूपये आणि इलेक्ट्रिक बाईक देण्यात येणार आहे.

# 'काय करायचे ते कर, पण मला जिवंत ठेव,' स्वारगेट प्रकरणातील तरुणीची विनवणी; दत्ता गाडेचा खोटेपणा उघड

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर मंगळवारी (ता. २५) बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेनंतर सर्व स्तरातून घटनेच्या संतप्त प्रतिक्रिया उमटत होत्या. या प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे (वय ३६) याला पोलिसांनी गुणाट गावातून अटक केली आहे. त्याला शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालयाने १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. मात्र आरोपी दत्ता गाडे याने स्वत:ला निर्दोष सांगत अनेक दावे केले होते, मात्र त्याचे सर्व दावे खोटे ठरले आहेत.

पीडित तरूणीची नराधमाकडे विनवणी

स्वारगेट शिवशाही बलात्कार प्रकरणात पीडित तरुणीचा जबाब पोलिसांनी नोंदवला. बलात्कारानंतर जिवे मारू नये म्हणून तरुणीने आरोपी दत्ता गाडेकडे विनवणी केली. दादा, तुला काय करायचे ते कर. पण मला जिवे मारू नको, अशी विनवणी पीडित तरूणीने




आरोपी दत्ता गाडे याच्याकडे केली होती. आरोपी दत्ता गाडेने शिवशाही बसमध्ये तरूणीला गळा दाबून जिवे मारण्याची धमकी दिली होती. पीडिता घाबरली आहे, ती कोणताही प्रतिकार करत नसल्याचे लक्षात येताच नराधम दत्ता गाडे याने शिवशाही बसमध्ये दुसऱ्यांदा अत्याचार केल्याचे तपासात समोर आले.

गाडेच्या बँक खात्यात फक्त २४९ रुपये शिल्लक

आरोपी दत्ता गाडेने पीडित तरुणीवर कुठलीही बळजबरी केली नाही. तिनेच मला बोलावले आणि आम्ही बसमध्ये गेलो. तिने माझ्याकडून साडेसात हजार रुपये घेतले, असा दावा केला होता. एवढंच नव्हे तर त्या ठिकाणी तरुणीचा एक एजंटही उपस्थित होता. पिडीत तरुणीवर बलात्कार झालाच नाही असा दावा आरोपी दत्ता गाडे याने केला होता. मात्र दत्ताने ज्या तरूणीला साडेसात हजार रुपये असा दावा केला, त्याच दत्ता गाडेच्या बँक खात्याची तपासणी करण्यात आली. तेव्हा त्याच्या खात्यात फक्त २४९ रुपये शिल्लक असल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे.

दोन वर्षांचे सीडीआर डिटेल्स तपासले

याशिवाय आपण पीडित तरुणीला महिनाभरापासून ओळखत होतो असा दावा दत्ता गाडेने वकिलांमार्फत केला होता. त्यामुळे या दोघांच्या फोन कॉलची चौकशी व्हावी, अशी मागणी दत्तात्रय गाडे याच्या वकिलांनी केली होती. त्यानुसार पुणे पोलिसांनी दत्तात्रय गाडे याला अटक केल्यानंतर त्याच्या आणि पीडितेच्या मोबाईलचे दोन वर्षांचे सीडीआर डिटेल्स तपासले आहेत. मात्र त्यामध्ये कुठेही संबंधित आरोपी आणि पीडिता हे एकमेकांच्या संपर्कात असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे दत्ता गाडेचा आणखी एक खोटारडेपणा उघड झाला.

काय आहे नेमकं प्रकरण?

पुण्यात मागील आठवड्यात मंगळवारी पहाटेच्या सुमारास एका तरुणीवर बालात्कार करण्यात आला. स्वारगेट स्थानकात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला. घटनेनंतर या प्रकरणातील आरोपी दत्ता गाडे फरार झाला होता. अखेर गुणाट गावात घुसून पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या.

# फास्ट ट्रक कोर्टात केस चालवून आरोपीला चौकात फाशी दिली पाहिजे; सुप्रिया सुळेंचा संताप

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात प्रवासी तरुणीला धमकावून नराधमाने




तिच्यावर शिवशाही बसमध्ये बलात्कार केल्याची घटना घडली होती. या घटनेने राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे. ७२ तासांच्या कालावधीनंतर आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. मात्र या नराधम आरोपीवर लवकरात लवकर कारवाई करत कठोर शिक्षा करावी अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

अशातच आता खासदार सुप्रिया सुळे यांनीसुद्धा या घटनेबाबत संताप व्यक्त केला आहे. त्या म्हणाल्या फास्ट ट्रक कोर्टात केस चालवून आरोपीला चौकात फाशी दिली पाहिजे. आज खासदार सुप्रिया सुळे यांनी स्वारगेट बसस्थानकाची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

काय म्हणाल्या सुप्रिया सुळे?

सुप्रिया सुळे म्हणाल्या, स्वारगेटची ही जी घटना घडली त्याला ज्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केलाय ते खूप दुर्दैवी आहे. आणि मी इथे आल्यावर बघितलं की इथून मुख्य रस्ता तर म्हणजे पन्नास पावलावर पण नाही, पंचवीस पावलावरच आहे. पोलीस स्टेशन पण जवळच आहे. त्यामुळे ही जी घटना झाली ती फार कुठे अंधारात, कोपऱ्यात वगैरे अशी झालेली नाही. त्या बिचाऱ्या मुलीला प्रचंड भीती दाखवली गेली, असं सुळे म्हणाल्या.